नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २८/०५/२०२१ रोजी दुपारी २.४०** वाजता मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि (१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ५. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ६. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ७. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ९. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| १०. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ११. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १२. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १४. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १५. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १६. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १७. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १८. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १९. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २०. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २१. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| २२. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २३. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| २४. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २७. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २८. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २९. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३१. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ३२. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३३. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३४. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ३५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३७. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ३८. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ३९. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४०. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४१. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४२. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ४३. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ४४. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ४५. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ४६. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ४७. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ४८. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ४९. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ५०. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ५१. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ५२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५३. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ५४. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ५५. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ५६. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ५७. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ५८. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ५९. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६०. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ६१. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ६२. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ६३. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ६४. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ६५. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ६६. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ६७. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ६८. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ७०. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ७१. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ७२. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ७३. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ७४. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ७५. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ७६. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ७७. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ७८. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ७९. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ८०. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ८१. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ८२. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ८३. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ८४. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ८५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ८६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ८७. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ८८. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ८९. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ९०. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ९१. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ९२. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ९३. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| ९४. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ३. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ४. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ५. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ६. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| ७. | ५ | अ | रिक्त | |
| ८. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १०. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| ११. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १२. | ८ | ब | रिक्त | |
| १३. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १४. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १५. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १६. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| १७. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| १८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| १९. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २०. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २१. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २३. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| २४. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २५. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २६. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| २७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २८. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| २९. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ३०. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ३१. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ३२. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ३३. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ३४. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ३५. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ३६. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ३७. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ३८. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ३९. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ४०. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ४१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ४२. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ४३. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ४४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ४५. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ४६. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ४७. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४८. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ४९. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ५०. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ५१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ५२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ५३. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ५४. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ५५. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ५६. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ५७. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ५८. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ५९. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ६०. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ६१. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ६२. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

वंदेमातरमनंतर सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.

(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)

**ठराव क्रमांक ८५:-** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

**आशा भोसले**

सदाबहार गायनाने गेल्या सात दशकांहूनही अधिक काळ रसिकांच्या हृदयावर अधिराज्य करणाऱ्या अष्टपैलू गायिका आशा भोसले यंदाच्या महाराष्ट्र भूषण पूरस्काराच्या मानकरी ठरल्या. सन 1943 पासून गायनक्षेत्रात कारकिर्दीला सुरवात केलेल्या आशा भोसले यांनी आजवर मराठीसह जवळपास सर्व भारतीय भाषांमध्ये गाणी गायली आहेत. इंग्रजी आणि रशियन भाषेतही त्यांनी गाणी गायली. अश्या या सदाबहार गायिकेला हा मानाचा पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## अल्फिया पठाण

पोलंड येथे नुकत्याच झालेल्या जागतिक युवा बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून देणारी नागपूरची आंतरराष्ट्रीय महिला मुष्टियोध्दा अल्फिया पठाण हिने आणखी एक दमदार कामगिरीची नोंद केली असून तिची स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट बॉक्सर म्हणून निवड झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## जयंत दुबळे

तलाईमन्नार (श्रीलंका) ते घनुषकोडी (भारत) दरम्यानची पाल्कची खाडी यशस्वीरीत्या पोहण्याचा विक्रम करणारा नागपूरचा सागरी जलतरणपटू जयंत दुबळे याने 29 कि.मी.अंतराची सागरी मोहिम विक्रमी 9 तास 20 मिनिटात पूर्ण केली. ही खाडी यशस्वीरित्या पोहणारा जयंत हा महाराष्ट्राचा चौथा तर विदर्भाचा पहिला जलतरणपटू ठरला आहे. अश्याप्रकारे विक्रम स्थापित केल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## सांची जीवने

भारतीय चित्रपटांचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जयंती प्रित्यर्थ दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय दादासाहेब फाळके चित्रपट पुरस्काराची घोषणा करण्यात आली. त्यात नागपूरची नाटय सिने कलावंत कलावंत सांची जीवने हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

<u>लक्ष्मीकांत देशपांडे व इतर</u>

अ.भा.मराठी नाटय परिषदेच्या नागपूर शाखेचा जीवन गौरव पुरस्कार यंदा जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत देशपांडे यांना जाहीर झाला असून सर्वोत्कृष्ट लेखनासाठी रामगणेश गडकरी, स्मृती पुरस्कार श्याम पेठकर यांना घोषित झाला. भाऊसाहेब सप्रे स्मृती पुरस्कार मृणाल पुराणिक यांना, देवाशिष रॉय स्मृती पुरस्कार चारूदत जिचकार यांना, सुमंत गडेकर स्मृती झाडीपट्टी श्रेष्ठ रंगकर्मी पुरस्कार अनिरूध्द वनकर यांना जाहीर झाला. दिनकर देशपांडे स्मृती नाटय समीक्षा गौरव पुरस्कार पत्रकार राम भाकरे यांना जाहीर झाला त्याबद्दल मनपाची ही सभा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**महापौर:-**प्रश्नोत्तराला सुरुवात करण्यात येते.

**<u>प्रश्न क्रमांक २३२</u>** -: म.न.पा.च्या समाज कल्याण विभागामार्फत अपंगानां व्यवसायासाठी स्टॉल मिळण्याबाबतचा प्रश्न

श्री मोहम्मद जमाल -: मा.महापौरजी, समाज कल्याण विभाग की तरफ से दिव्यांग बंधुओ को व्यवसाय करने के लिये कब स्टॉल उपलब्ध करवाये जायेगें, इस संदर्भ मे वारंवार प्रशासन का ध्यान आकर्षित किया गया है, लैकिन प्रशासन की ओर से अभी तक दिव्यांग बंधुओ को व्यवसाय के लिये स्टॉल उपलब्ध नही करवाये गये है, यह दुख की बात है, हम जब भी इस विषय के संदर्भ मे बोलते है तो प्रशासन व्दारा गोलमोल उत्तर दिये जाते है।

अति.आयुक्त( श्री निपाणे ) :- मा.महापौरजी, गठई कामगारांना स्टॉल वाटप करण्याच्या संदर्भात शासनाचा निधी आहे, त्या निधीमधुन आपण स्टॉल वाटप करीत आहे, दरम्यानच्या काळात महसुल विभागाच्या जागा देण्याच्या संदर्भात अधिसूचना निघाली होती, दिव्यांग लोकांना जागा देण्याच्या संदर्भात मागे सभा घेण्यांत आली होती त्यात असे ठरले होते कि, गठई कामगाराप्रमाणे दिव्यांग व्यक्तिकरिता जागा देण्याबाबत धोरण आखण्यांत यावे, त्यानुसार पुढील महासभेत तो प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

महापौर :- इस विषय को लेकर शासन के कोई निर्देश नही है दुकाने देने के लिये ऐसा प्रशासन का कहना है, केवल महसुल विभाग का परिपत्रक था वह महसुल की जगह देने के लिये है, इसलिये इस विषय को लेकर के पिछली सभा मे जब चर्चा हुई तो मैंने कहां था कि, जिस प्रकार से गठई कामगार को लेकर के शासन के निर्देश है उसी प्रकार से एक पॉलिसी बनाकर सभागृह मे रखी जाये। अभी तक कोई नियमावली नही है जिसके अंतर्गत अपंग बंधुओ को व्यावसाय करने के लिये स्टॉल दे सके,।

अति.आयुक्त( श्री निपाणे ):- मा.महापौरजी, विधी समितीच्या दिनांक १७-०६-२०१९ च्या सभेत ठराव झाला होता त्या अनुषंगाने समाज कल्याण विभागानी आवेदन मागीतले होते. व ती आवेदने निरीक्षणाकरिता बाजार विभागाकडे पाठविले, दरम्यानच्या काळात धोरण तयार करण्याच्या दृष्टीने त्यावर चर्चा झाली नाही.

श्री मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, प्रशासन दिव्यांग बंधुओ के साथ मजाक कर रहा है, उनको बार बार चक्कर लगवाने लगवा रहा है, उनको तारीख पर तारीख दी जा रही है, दिव्यांग बंधुओ की ओर से इस संदर्भ मे वारंवार डेप्युटेशन दिये गये है, लैकिन प्रशासन ने आज तक उनके संदर्भ मे ठोस भुमिका नही लिया है, प्रशासन ने उनको

आवेदन करने के लिये कहां कि, हम आपको जगह देगें लैकिन जब जगह देने की बात आयी तो किसी प्रकार का निर्णय नही लिया जा रहा है।

महापौर :-नागपूर महानगरपालिका के आनेवाले सभागृह मे इस विषय को लेकर एक पॉलिसी बनाकर सभागृह के पटल पर रखी जाये, ऐसा नही है कि, हम लोग दिव्यांगो के लिये कार्य नही कर रहे है, दिव्यांगो को रोजगार उपलब्ध कराने के लिये गतवर्ष नागपूर महानगरपालिकाने ९० लोगो को २-२ लाख रुपयो की सानुग्रह राशी प्रदान करी, इस साल भी नागपूर महानगरपालिका के माध्यम से २-२ लाख रुपयो की सानुग्रह राशी ९० लोगो को दी गयी है, १८० लोगो को महानगरपालिका के माध्यम से घर से रोजगार करने के लिये निधी दी गयी है, इसका मतलब महानगरपालिका दुर्लक्ष कर रही है ऐसा नही है, रास्ते पर दुकान लगाने के लिये स्टॉल रुम के लिये जगह देने के बारे मे महानगरपालिका के पास मे पॉलिसी नही है, यह विषय सभागृह मे जब पिछली बार चर्चा मे आया तो जिस प्रकार से हम गठई कामगारों को स्टॉल लगाने के लिये जगह दे रहे है, उसी प्रकार से निर्णय महानगरपालिकाने लेना चाहिये, ऐसा प्रस्ताव आनेवाली सभागृह मे रखा जाये, ऐसे निर्देश प्रशासन को इस विषय के माध्यम से दिये जाते है।

<u>**प्रश्न क्र. २३९**</u>:- नागपूर म.न.पा. कडुन किती लिज करण्यांत आलेल्या आहेत या संदर्भातील प्रश्नावर

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नावर प्रशासनानी पहिले उत्तर द्यावे.

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग) :- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षनेते श्री तानाजी वनवे यांनी प्रश्न क्रमांक २३९ बाबत प्रश्न विचारलेला आहे, त्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेकडुन किती लिज करण्यांत आलेल्या आहे, किती लिजचे नुतनीकरण करण्यांत आलेले नाही, या सर्व प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. नागपूर महानगरपालिकेचे ३६३४ भुखंड आहे त्यापैकी १०८४ भुखंडाचे नुतनीकरण झालेले नाही, असे उत्तर देण्यांत आलेले आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, प्रशासनाने जे लिज केलेले आहे त्याच्यामध्ये झोपडपटटयांमध्ये राहणा-या लोकांचे नुतनीकरण झालेले नाही.

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी, जे ३६३४ भुखंड आहे ते जवळपास २२ अश्या वस्त्या आहे, त्या मधील हे भुखंड आहे. आणि मा.विरोधी पक्षनेत्यांचा हा प्रश्न असेल कि, ज्या वस्त्यामध्ये झोपडपटटया आहेत, त्यामध्ये शासनाच्या निर्णयानुसार ७-२-१९ चा जो शासन निर्णय आहे,-

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ही जी प्रक्रिया सुरु आहे, याच्यामध्ये जुन्या लोकांचा आपण समावेश करणार आहोत काय ?

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी,जेव्हा आपण सर्व्हेक्षण करतो आणि त्या सर्व्हेक्षण मध्ये असे आढळुन आले कि, त्यांच्याकडे ऑलरेडी नागपूर महानगरपालिकेचा भाडे पटटा आहे, अश्या लोकांना ०७-०२-२०१९ च्या जी.आर.नुसार नवीन भाडे पटटा देण्यांत येत नाही. ज्यांच्याकडे डाक्युमेंट नाही, जुना भाडे पटटा नाही, म्हणजे असे पण प्रकरण आढळुन आले आहे कि ज्यांना आपण १९८४ ला भाडे पटटा दिलेला होता, परंतु त्या व्यक्तिनी ती जागा दुस-याला हस्तांतरण केली किंवा विकली  किंवा त्याच्या मुलांना मिळाली पण त्या मुलांकडे ही त्याच्या वडिलांचे डाक्युमेंट नाही. दुस-या खरेदीदाराकडे पण डाक्युमेंट नाही, अश्या लोकांना ०७-०२-२०१९ च्या शासन निर्णयानुसार आपण भाडे पटटा देतो.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, भाडे पटटा देत असतांना महानगरपालिका आणि एन.आय.टी. ही दोन्ही वेगवेगळी संस्था आहे, एन.आय.टी.च्या संबंधाने जे भाडे पटटा देण्याचा कार्य सुरु होता जुन्या काळामध्ये आता ते बंद झालेला आहे, त्या संबंधाने प्रशासनाची काय भुमिका आहे.

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी, शासनानी याबाबत जी.आर. काढला होता, आणि तो पहिला जी.आर. २०१८ चा होता त्यामध्ये सरसकट लिहिले होते कि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मालकीच्या ज्या जागा असतील, शासकीय मालकीच्या जागा असतील त्या जागेवर ज्यांच्या जागा गेल्या असेल त्यांना भाडे पटटा देण्यांत येईल त्यानंतर त्यात सुधारणा करण्यांत आली आणि ही सुधारणा सन २०२१ ला आली, जर नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची जागा असेल तर नागपूर महानगरपालिकेनी त्यांना भाडे पटटा द्यावा.  आणि जर ती एनआयटीच्या मालकीची जागा असेल तर एन.आय.टी. ने भाडे पटटा द्यावा. शासनानी २६ फेब्रुवारी २०१९ च्या जी.आर.मध्ये लिहिलेले आहे कि जर एनआयटीची जागा असेल तर एन.आय.टी.ने त्यांना भाडे पटटा द्यावा. जर ती नझुल किंवा रेव्हेन्युच्या ॲथारीटीची जागा असेल तर नझुल किंवा रेव्हेन्युच्या ॲथारीटीनी त्यांना भाडे पटटा द्यावा. असेनिर्देश असल्यामुळे त्या त्या वेळच्या शासन निर्णयानुसार निर्णय घेण्याची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिका करते आहे. नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर असलेल्या २०११ पूर्वी पासून अतिक्रमण असलेल्या जागेचा भाडे पटटा हे नागपूर महानगरपालिका करीत आहे.

श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात माझा एक प्रश्न आहे, आता सहा.आयुक्त, श्री मेश्रामजी जे सांगत आहे २०१९ चा जी.आर. २०१४ चा सर्व्हे तर असाही होवु शकतो कि, एखाद्या व्यक्तिनी नागपूर महानगरपालिकेच्या जागेवर त्यांनी भाडे पटटा घेतलेला आहे, तसेच त्याच्या व्यक्तिगत मालकीचा प्लॉट नागपूर शहरामध्ये असू शकतो, तर आपल्या कायद्यामध्ये अशी  तरतुद आहे काय ?  आपण त्यांच्याकडुन शपथपत्र घेतो काय ?  किंवा सर्चिंगची व्यवस्था आपल्याकडे आहे काय ? ज्यांनी नागपूर महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले आहे, त्याच्या मालकीचा प्लॉट या शहरामध्ये कुठे आहे, याबाबत आपल्या कायद्यामध्ये कुठे माहिती दिलेली आहे काय ? आणि याची काय प्रक्रिया आहे.

सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी, केंद्र शासनानी जो निर्णय घेतलेला आहे त्याचा प्रमुख उद्येश हा

होता कि, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सर्वासाठी घरे उपलब्ध करुन द्यावयाची आहे त्याकरिता त्या नागरिकांकडे स्वत:ची काही ओळखपत्रे असावयास पाहिजे, पण हे जे अतिक्रमणधारक आहे, याच्याकडे कुठलाच असा डाक्युमेंट नव्हता, त्या माध्यमातुन आपण हे भाडे पटटा देत आहे. अशी अट आहे कि भारत देशात त्याच्या नावांनी एकच मालमत्ता असावी. असा एक उल्लेख असल्याचा आढळते.

महापौर :- मा.सदस्यांचा प्रश्न अगदी स्पष्ट आहे कि, महानगरपालिकेकडे अशी यंत्रणा आहे काय ? आपण ज्याला पटटा वाटत करीत आहे त्याच्या नावांनी शहरात दुसरी जागा आहे काय ? त्याच्या सर्व्हेसाठी आपल्याकडे यंत्रणा आहे काय ? असा प्रश्न आहे.

सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी, त्याअनुषंगाने आपण त्यांचा सोशल व इकोनॉमिक सर्व्हे करतो, त्या अंतर्गत आपण प्रापर्टी टॅक्स रिसीप्ट घेतो आहे. आणि भाडे पटटा कक्षाच्या नांवानी त्या व्यक्तिच्या माध्यमातुन प्रापर्टी टॅक्स रेकॉर्डला आणखी कुठे काही नोंद आहे काय ? याबाबतची तपासणी केल्या जाते.

श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे कि, एखाद्या व्यक्तिनी २०१४ साली किंवा त्याच्या अगोदर महानगरपालिकेचा भाडे पटटा घेतला, आणि आता त्याच्याकडे नागपरू शहरात दुसरा प्लॉट आहे समजा, मग त्याला नागपूर महानगरपालिकेच्या भाडे पटटयाची गरज पडणार नाही, कारण त्याच्याकडे राहण्याची व्यवस्था नव्हती म्हणुन एक सोशल आस्पेक्ट म्हणुन ती व्यवस्था सरकारतर्फे करण्यांत आली. पण त्याची आर्थिक परिस्थिती चांगली झाली आणि त्याच्याकडे दुसरी प्रापर्टी आहे, त्याची ती प्रापर्टी सर्चिंग करुन त्याला खाली करण्याचा काही प्रोव्हीजन आहे काय ? दुसरे असे कि ज्यावेळी आपण नवीन भाडे पटटा अलॉट करतो त्यावेळेस त्याच्या स्वत:च्या मालकीची दुसरीकडे जागा आहे काय ? याची पाहणी करतो काय ? त्याच्या स्वत:च्या मालकीची दुसरीकडे जागा असेल तर त्याला नागपूर महानगरपालिकेचा भाडे पटटा देण्याची आवश्यकता काय आहे. हा त्या मागचा उद्येश होता म्हणुन मी हे प्रश्न विचारले परंतु मेश्राम साहब त्या प्रश्नाचे बरोबर उत्तर देवुन राहिले नाही. यात प्रोव्हीजन आहे किंवा नाही हे सभागृहाला कळले पाहिजे, नसेल तर तसे सांगीतले पाहिजे. ही त्याच्यामागची भावना आहे. एक व्यक्ति एकीकडे नागपूर शहरात महानगरपालिकेकडुन भाडे पटटा घेतो, आणि दुसरीकडे त्याच्या स्वत:च्या प्लॉटवर घर बांधुन त्याला किरायेने देतो, म्हणजे हा एखाद्या गरीब माणसावर अन्याय आहे. त्यामुळे अशी काही व्यवस्था आपल्याकडे आहे काय ?कि आपण त्या व्यक्तिला आयडेंटीफाय करु शकतो. ही व्यवस्था आपल्याकडे आहे काय ? आणि तशी कायद्यात प्रोव्हीजन आहे काय ?

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग) :- मा.महापौरजी,त्या अनुषंगाने मी उत्तर दिले होते कि झोपडपटटी भाडे पटटे वाटप कक्षांकडुन आपण माहिती घेतो आहे कि झोपडपटटी सर्व्हेमध्ये जो व्यक्ति आढळुन आलेला आहे, त्या आढळलेल्या व्यक्तिनी अप्लॉय केलेला आहे, त्याच्या नावांनी नागपूर शहरात आणखी कुठली मालमत्ता आहे काय ? यावर असे लक्षात आले आहे कि एकाच व्यक्तिच्या नांवावर दोन मालमत्ता कुठे तरी आहे, जर असे आढळुन आले तर पटटे वाटप कक्षामार्फत त्याला भाडे पटटे देण्यांत येणार नाही.

श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मी एक सूचना देतो, आता माझया प्रश्नाच्या अनुषंगाने नागपूर शहरात दोन डेव्हलपींग ॲथारीटी आहे, एक एनआयटी व एक नागपूर महानगरपालिका अनेक असे प्लॉट आहे ज्याच्यावर नागपूर महानगरपालिकेचा टॅक्स लागलेला नाही, त्यामुळे आपण सर्चिंग करतांना तश्याप्रकारचे आदेश प्रशासनाला द्यावे कि, सर्चिंग करतांना एनआयटीचा रेकॉर्ड सुध्दा चेक व्हावयास पाहिजे, फक्त महानगरपालिकेच्या टॅक्सच्या भरवश्यावर आपण सर्चिंग करु तर अश्याप्रकारे आपल्याला डुप्लीकेट पटटे मोठयाप्रमाणात द्यावे लागतील, याच्याकरिता ही व्यवस्था ज्यांना राहण्यासाठी जागा नाही, व ज्यांना जागेची खरी गरज आहे, अश्या लोकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे म्हणुन दोन्ही साईटला आपण चेकिंग करुन अश्या काही केसेस असेल तर आयडेंटीफाय करुन त्यांच्यावर कार्यवाही करुन ज्यांच्याकडे नागपूर शहरामध्ये खरोखरच राहण्यासाठी जागा नाही, त्यांना हे पटटे उपलबध करुन द्यावे. अशी माझी याठिकाणी सूचना आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, लिजचा रेट वाढविला आहे काय ? जुना जो रेट होता त्याच्यामध्ये काही वाढ केली आहे काय ?

श्री. मेश्राम सहा.आयुक्त( स्थावर विभाग):- मा.महापौरजी,मा.विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो या संदर्भातील असावा कि, नागपूर महानगरपालिकेनी जो भाडे पटटा दिलेला आहे, त्याजागेची जर लिज संपली असेल तर त्याचे नुतनीकरण करणे किंवा त्यांनी वापरामध्ये काही बदल केला असेल तर त्याचे नियमितीकरण करणे किंवा त्यांनी हस्तांतरण केले असेल तर हस्तांतरण करणे याकरिता सभागृहानी ठराव क्रमांक २९९, दिनांक २०.१०.२०१८ ला याबाबत पॉलिसी डिसाईड केली होती त्या पॉलिसी अंतर्गत जर त्या भाडे पटटाधारकांनी या आपल्या भाडे पटटयाच्या कुठल्या अटीचा जर शर्त भंग केला असेल तर शर्तभंग म्हणजे त्यांनी वेळेवर आपला भाडे पटटा नुतनीकरण केला नसेल किंवा दुस-याला हस्तांतरण केला असेल तर अश्यावेळेस जर रहिवासी वापर असेल तर त्याला ६ टक्के हस्तांतरण शुल्क आकारावे. जर तो पार्ट कर्मशियल असेल तर १५ टक्के हस्तांतरण शुल्क आकारावे. हे शुल्क आपल्या सभागृहानी २९९ ठरावाच्या अंतर्गत ठरविलेले आहे. त्यात त्यांनी हे पण सूचित केले कि ग्राउंट रेंट हा पाईंट झीरो दोन टक्के असावे. यानंतर शासनाची अधिसूचना आली १३.०९.२०१९ ला, १३.०९.२०१९ च्या सूचनेनुसार शासनानी महाराष्ट्र मालमत्ता स्थावर नुतनीकरण व हस्तांतरण याची नियमावली बनविलेली आहे. आणि त्या नियमावलीच्याआधारे कोणाचे नुतनीकरण करावे व कोणाचे हस्तांतरण करावे, याबाबत पात्रता व अटी ठरवुन दिलेल्या आहेत. त्या नियमावलीमध्ये असे सुध्दा नमुद करण्यांत आली आहे कि यांच्याकडुन ग्राउंट रेंट हे बाजार मुल्यांच्या ८ टक्के घेण्यांत यावा याबाबत मागच्या सभागृहात चर्चा झालेली आहे. चर्चा झाल्यानंतर या अनुषंगाने एक समिती गठित करण्यांत आलेली आहे, मा.श्री संदिपजी जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व मा.विरोधी पक्षनेता सुध्दा त्या समितीचे सदस्य आहे. त्या अंतर्गत २९९ ठरावाप्रमाणे आपण लोकांना जी डिमांड देतो, याच्यानंतर त्याबाबत शासनानी जी अधिसूचना जारी केलेली आहे, त्याबाबत लोकांच्या काही तक्रारी असतील, डेप्युटेशन असेल तर या समितीसमोर ठेवल्या जाणार आहे आणि त्या माध्यमातुन त्याच्यावर विचार होणार आहे. हा एक मुद्या दुसरा रुलिंग २५.०३.२०२१ च्या बैठकीत असा निर्णय झाला कि, १३.०९.२०१९ ची जी अधिसूचना ज्यानुसार नियमावली बनविण्यांत आली, ती नियमावली सभागृहानी रद्य ठरविली आहे, आणि ही बाब महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणुन द्यावी, असे अवगत करण्यांत यावे, असे आपण रुलिंग दिले होते. त्या अनुषंगाने प्रशासनानी पत्राव्दारे ही बाब महाराष्ट्र शासनाच्या

निदर्शनास आणुन दिली आहे.

श्री हरीश ग्वालबंसी :- मा.महापौरजी, इस विषय से संबंधित मेरा एक प्रश्न है, नागपूर महानगरपालिका के डी.पी. मे जहा रोड बताया गया है, वहा झोपडपटटी बैठी है वह झोपडपटटी कई साल पुरानी है, और वह रोड अभी दो ढाई साल पहले डी.पी. प्लॉन मे अॅड हुआ, तो वह झोपडपटटी को हम स्लम मे ला सकते है क्या ?

महापौर :- अगर वह झोपडपटटी २०११ से पहले की है तो बिल्कुल आ सकती है, आप डाकुमेंट देकर के पुरावे दाखल किजीये, मेश्राम साहब के पास मे वह उसपर कार्यवाही करेगें ? मा.सत्तापक्षनेते श्री.अविनाशजी ठाकरे यांनी सूचित केल्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने नागपूर महानगरपालिका कडुन भाडेपट्टा घेतला व त्याच्याजवळ त्याचा स्वत:च्या मालकीचा दुसरा प्लॉट आहे, आणि त्या ठिकाणी तो घर बांधुन दुस-यानां किरायाने देतो तर त्याला नागपूर महानगरपालिकेच्या भाडेपट्याची गरज पडणार नाही, त्याच्या मालमत्तेचा शोध घेऊन भाडेपट्टा परत घेण्यांत यावा व त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी. सर्चिंग के समय केवल नागपूर महानगरपालिका के लगे हुऐ टॅक्स को न चेक करते हुऐ, एन.आय.टी. के जो प्लॉट है उस यादी को भी हम चेक करे जिससे एक व्यक्ति दो जगह घर न ले सके, इस दृष्टीसे महानगरपालिकाने अपनी यंत्रणा मे सुधार करना चाहिये, मा.विरोधी पक्षनेता ने यह विषय चर्चा मे लाया, वह मा.संदिपजी जोशी के साथ इस विषय से संदर्भ मे जो समिती बनी है, उस समिती मे है, उस समिती की बैठक लेकर के यथाशिघ्र इस विषय पर निर्णय लेना चाहिये, निर्णय लेने के लिये मा.विरोधी पक्षनेता समिती को अग्रेषित करे और वह निर्णय सभागृह को सूचित करे, सभागृह उसपर आगे का निर्णय लेगा।

**प्रश्न क्रं. २४१** :- नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या नवीन डीसीआर प्रमाणे फायर एनओसी किती माळयाप्रमाणे आवश्यक आहे ? या संदर्भातील प्रश्नावर

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना) :-मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षनेते यांचा विषय होता कि, नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाप्रमाणे नवीन डीसीआर प्रमाणे फायर एनओसी किती माळयाप्रमाणे आवश्यक आहे. त्या संदर्भात माहिती देण्यांत आली होती कि, शासनातर्फे संपुर्ण शहराकरिता एकात्मिक विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली दिनांक २०-१२-२०२० पासून लागु करण्यांत आलेली आहे. यामध्ये तरतुद क्रमांक १.३ नमुद केल्याप्रमाणे बिल्डींगकरिता अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाण पत्र घेणे आवश्यक आहे, ज्या इमारतीची उंची जासत आहे, त्याची लेव्हल तपासुन घेण्यांत यावी, ज्या इमारतीचा वापर सार्वजनिक वाणिज्यीक औद्योगिक वापराकरिता व एका पेक्षा जास्त माळयावर असलेल्या क्षेत्राकरिता त्या इमारतीची उंची २४ मिटर पेक्षा कमी असली तरी त्या इमारतीचा वापर व ५०० पेक्षा जास्त ज्या इमारतीचा चटाई क्षेत्र आहे, त्या इमारतीकरिता फायर एनओसी डीसीआरमध्ये नमुद आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, आता कोविडच्या काळामध्ये अनेक रुग्णालयामध्ये जाण्याचा प्रसंग आला, त्याठिकाणी ब-याच रुग्णालयाला फायर विभागची मान्यता नाही, असे लक्षात आले आहे. आणि त्या रुग्णालयामध्ये फायरचे इक्वीप्मेंट सुध्दा नाही, याबाबत कालच उपसंचालक नगररचना विभाग यांच्याशी चर्चा झाली आहे. याबाबत आम्ही त्यांना तक्रारी दिलेल्या आहे, ज्या लोकांनी फायर नियमाचा उल्लंघन केलेला आहे, अश्या लोकांवरआपण आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे.

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना):-मा.महापौरजी, सदर प्रश्न हा अनधिकृत बांधकामासंबंधी आहे तो झोनल कार्यालयातर्फे काढण्यांत येईल.

महापौर :- मा.विरोधी पक्षनेत्यांचा जो प्रश्न आहे तो अनधिकृत बांधकामवाला नाही आहे, त्यांचे म्हणणे असे आहे कि ज्या रुग्णालयामध्ये फायरच्या एनओसीची आवश्यकता होता, त्यांनी घेतली नाही, अश्यावेळी आपण त्यांच्यावर काही कार्यवाही केली आहे काय ?

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना):-मा.महापौरजी,त्या विषयी फायर विभागनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ज्यावेळी आपण आरोग्य विभागाच्या एखाद्या रुग्णालयाच्या संदर्भात बिल्डींग प्लॉन मंजूर करतो त्यावेळी नगररचना विभागाकडुन आपण त्याची तपासणी करतो, त्या बिल्डींगवाल्यांना फायर ब्रिगेडची एनओसी घेतलेली आहे काय ?

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना) :-मा.महापौरजी,कुठलाही रुग्णालयांचा नकाशा विदाउट फायर ब्रिगेडच्या एनओसी शिवाय नगररचना विभागाकडुन मंजूर झालेला नाही. यामध्ये रुग्णालयांनी फायरचे साहित्य लावलेले आहे किंवा नाही याकरिता जेव्हा ते ॲक्व्हेपेंसी सर्टीफिकेटकरिता येतात, तेव्हा आम्ही फायर विभागाचा सर्टीफिकेट मागवितो आणि त्याआधारावर मग ती ऑक्व्हीपेंसी सर्टीफिकेट देण्यांत येते.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ज्या लोकांच्या संदर्भात तक्रारी आलेली आहे ज्यांनी आपल्या रुग्णालयामध्ये फायरचे साहित्य लावले नाही, अश्या लोकांवर यांनी कार्यवाही केलेली आहे काय ? हे विचारण्यांत यावे.

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना):-मा.महापौरजी, अश्याप्रकारची तक्रार प्राप्त झाली आहे काय ? हे तपासुन घेण्यांत येईल, फायर ब्रिगेड विभागाच्या सोबत संपर्क साधुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यांत येईल.

महापौर :- मा.विरोधी पक्षनेत्यांकडे जर अशी तक्रार आली असेल तर त्याचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन त्याच्यावर काय

कार्यवाही झालेली आहे, त्याची माहिती विरोधी पक्षनेत्यांपर्यंत पुरविण्यांत यावी.

श्री दिपक चौधरी :- मा.महापौरजी, मैंने अभी दो तीन पहले एक ऑन लाईन मिटींग ली थी, जिन लोगो ने हॉस्पिटल बनाये है और जिनका प्लॉन मंजूर नही है, कुछ लोगो ने ऐसे हॉस्पिटल खोल लिये है, कोविड सेंटर के नाम के निचे उन्होने बहुत सारा दुर्यव्यवहार किया है, बहुत सारे लोगो को बहुत सारी परेशानियाँ हुई तो मैंने फायर ब्रिगेड और राजेंद्रजी सोनकुसरे साहब, गेडाम साहब के साथ और स्वास्थ विभाग ऐसी एक वर्चुअल मिटींग ली थी, और उस मिटींग मे तीनो को कंबाईन करके कार्यवाही करने के निर्देश दिये थे, इसके ऊपर इनका क्या हुआ यह बात अभी तक पता नही चली है.

महापौर :- मा.सदस्य, दिपकजी के प्रश्न पर प्रशासन उत्तर दे.

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना):-मा.महापौरजी, अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात कार्यवाही एमआरटीपी ॲक्टच्या कलमान्वये झोन कार्यालयातर्फे करण्यांत येते.

महापौर :- मा.सभापतीनी निर्देश दिल्यानंतर आपण झोनला हे निर्देश अग्रेषित करुन काही कार्यवाही केली आहे काय ?

श्री. हर्षल गेडाम (सहा.संचालक नगररचना):-मा.महापौरजी,एखाद्या इमारतीमध्ये आरोग्य विभागाची परवानगी न घेता जर हॉस्पिटल सुरु आहे तर त्याकरिता झोन कार्यालयातर्फे कार्यवाही करण्यांत येते, जर त्या इमारतधारकांनी फायरचे इक्वीपमेंट लावले नसेल तर फायर विभागाकडुन कार्यवाही करण्यांत येते, मागच्या सभेत मा.सभापती, अग्निशम समिती यांनी जे निर्देश दिले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे सुरु आहे.

श्री दिपक चौधरी :- मा.महापौरजी, उचके साहब के साथ हमारी जो चर्चा हुई थी उस समय गेडाम साहब भी उपस्थित थे आप उचके सर से भी माहिती ले सकते है.

महापौर :-नागपूर शहरातील अनेक रुग्णालयानी फायरची एनओसी घेतली नाही, नगररचना विभागाकडुन अनेक रुग्णालयाच्या इमारतीचे प्लॅन मंजूर करण्यांत आले नाही, अशी मा.विरोधी पक्षनेत्यांकडे तक्रार प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले आहे, मा.विरोधी पक्षनेत्यांकडे अश्याप्रकारची तक्रार आली असेल तर सहा.संचालक, नगररचना यांनी मा.विरोधी पक्षनेत्यांकडुन तक्रार घेवून प्रत्यक्ष त्या रुग्णालयाच्या इमारतीच्या मौक्याचे निरीक्षण करुन त्याची माहिती मा.विरोधी पक्षनेत्यांपर्यंत पोहोचावी. चर्चेत मा.सभापती,अग्निशमन व विद्युत विशेष समिती श्री दिपक चौधरी यांनी सूचित केले कि, कोव्हीडच्या काळात अनेक लोकांनी मोठया इमारतीमध्ये कोव्हीड रुग्णालय स्थापन केले आहे परंतु त्या इमारतीचे नकाशे मंजूर करण्यांत आले नाही, त्या ठिकाणी फायरचे साहित्य लावण्यांत आले नाही, फायर विभागाकडुन नाहरकत प्रमाणपत्र घेण्यांत आले नाही. या अनुषंगाने आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग व नगररचना

विभागाला सोबत मिळवुन कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यांत आले होते, त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. मा.सभापती, अग्निशमन व विद्युत विशेष समिती इन्होने इस विषय को लेकर के जो कार्यवाही के निर्देश दिये है, आनेवाले सात दिन के अंदर स्वास्थ विभाग, नगररचना विभाग और अग्निशमन विभाग यह तिनो विभाग मिलकर के झोन वाईज अपनी टीम बनाकर के सर्व्हे करके संपुर्ण जानकारी मा.सभापती, अग्निशमन व विद्युत विशेष समिती के पास दे, और इस बात की जानकारी मा.आयुक्त तक भी पहोंचाये, अगर कोई गलत है तो उसपर कार्यवाही अग्रेषित करते हुऐ आगे की कार्यवाही करे, ऐसे निर्देश इस सभागृह के माध्यम से प्रशासन को दिये जाते है।

**<u>प्रश्न क्र.२५०</u>**:- नागपूर शहरात किती खाजगी कोविड रुग्णालयांना मान्यता दिलेली आहे ? या संदर्भातील प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, माझा प्रश्न क्र. २५० अंतर्गत मी जी माहिती विचारलेली आहे त्याची माहिती माझ्यापर्यंत पोहचलेली नाही. प्रशासनाने उत्तराचे वाचन करावे.

महापौर:- सर्वात आधी तर प्रशासनाने उत्तर दयावे त्यांच्यापर्यंत माहिती कां पोहचलेली नाही. त्यांना उत्तर न पोहचण्याचे काय कारण आहे.

निगम सचिव(श्रीमती लाडे):- मा.महापौरजी, उत्तराची प्रत पोहचलेली आहे.

महापौर:- जे उत्तर दिले आहे त्याचे प्रशासनाने वाचन करावे.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):-मा.महापौरजी, मा.प्रफुल्ल गुडधेजी चा जो प्रश्न आहे तो पाच विभागामध्ये आहे.पहिला प्रश्न होता की नागपूर शहरात किती खाजगी कोविड रुग्णालयांना मान्यता दिलेली आहे. त्याचे उत्तर दिले होते की १५२ रुग्णालयाला मान्यता दिलेली आहे. त्यांचा दुसरा प्रश्न होता की प्रत्येक खाजगी कोविड रुग्णालयांच्या मान्यतेची तारीख आणि खाटांची संख्येची माहिती देण्यात यावी. ती माहिती संलग्न करुन उत्तरात दिली होती. तिसरा प्रश्न होता, राज्य सरकारच्या निर्णयाप्रमाणे ८० टक्के खाटा महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या दरावर उपलब्ध करुन दयावयास असे बंधन आहे. त्याप्रमाणे ८० टक्के रुग्ण निर्धारित करण्यासाठी त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याकरिता महानगरपालिकेने कोणती यंत्रणा उभारलेली आहे त्याचे उत्तर अशा प्रकारे दिले होते. अति.आयुक्त जलज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय ऑडीट टीमची स्थापना करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्व कोविड रुग्णालयात ऑडीटरची नियुक्ती करण्यात आली आहे. कोविड कंट्रोल रुम मधून संदर्भीत रुग्णांस ८० टक्के निर्देशित उपचार करण्यात येते. रुग्णालयाने आकारलेल्या शुल्काची तपासणी संबंधित ऑडीटरद्वारे केली जाते. चौथा प्रश्न असा होता, माहे जानेवारी २०२१ पासून महानगरपालिकेच्या निकषाप्रमाणे अधिक रक्कम खाजगी रुग्णालयाने आकारल्याबाबत किती तक्रारी प्राप्त झाल्या त्या अनुषंगाने किती कार्यवाहया करण्यात आल्या. त्याचे उत्तर असे अशा प्रकारे संलग्न करुन देण्यात आले होते की अति.आयुक्त सामान्य प्रशासन विभाग यांच्या कार्यालयात, खाजगी रुग्णालयासंदर्भात तपशीलवार माहिती प्राप्त झाली असून ती संलग्न करुन देण्यात येत आहे. ज्यामध्ये जानेवारी महिन्यापासून १३३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि त्याच्यामध्ये दुसरा भाग होता त्यामध्ये किती कार्यवाही करण्यात आली. त्यापैकी जे ८० टक्केच्या तक्रारी होत्या त्यामध्ये १३३ पैकी ४० तक्रारी ८० टक्केच्या बाबतीत होत्या आणि त्याच्याच २ लक्ष ४४ हजार रक्कम परतफेड करण्याची होती. त्याच्यातून ७२ हजार रुपये आतापर्यंत परतफेड केलेली आहे. आणि शिल्लक १ लक्ष ५२ हजार ३३३ रुपये शिल्लक आहे. पाचवा प्रश्न होता, २० टक्के खाटा या खाजगी रुग्णालयाच्या अखत्यारित

त्याचे दरनिहाय निश्चिती काय आहे? याचे उत्तर असे दिले होते अशा प्रकारचे दर निश्चितीची महानगरपालिकाकडे माहिती नाही आणि शासन परिपत्रक ३१.०८.२०२० चे आहे त्या अनुषंगाने दिलेले निर्देशाच्या अनुषंगाने २० टक्के रिक्त असलेल्या खाटाच्या संदर्भात खाजगी रुग्णालय प्रशासनास त्यांच्या दरानुसार उपचार करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मा.अति.आयुक्त यांनी प्रश्नाचे उत्तर दिले त्या अनुषंगाने माझा उप प्रश्न आहे. कोविड रुग्णालयाला मान्यता देण्याकरिता त्यांनी कुठल्या नियमावलीनुसार कोविड रुग्णालयाला मान्यता दिली. कुठल्या मार्गदर्शक सुचना होत्या काय? शासनाच्या काही गाईडलाईन होत्या काय? कोणत्या अधिसुचनाच्या अन्वये महानगरपालिकेने खाजगी कोविड रुग्णालयाला मान्यता दिली. दुसरा प्रश्न असा होता, एकंदरीत १५२ रुग्णालयांना यांनी कोविड रुग्णालय म्हणून मान्यता दिली होती. नागपूर शहरामध्ये सगळयात मोठा घोळ झाला, ८० टक्के खाटांची उपलब्धता, ८० टक्के खाटाच्या उपलब्धतेबाबत १३३ तक्रारी आल्या. त्या १५२ रुग्णालयापैंकी किती दवाखान्याच्या संदर्भात या तक्रारी आल्या हा माझा दुसरा प्रश्न आहे मा.महापौरजी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, १३३ तक्रारी आहेत त्यापैकी ८० टक्क्याच्या संदर्भात आढळल्या होत्या. १४० तक्रारी होत्या त्या वेगवेगळया हॉस्पीटलच्या होत्या.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी,१५२ रुग्णालयांपैकी किती रुग्णालयांच्या बाबतीत तक्रारी होत्या.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, वेगवेगळया हॉस्पीटलच्या बाबतीत तक्रारी होत्या. त्याची सविस्तर माहिती मी देवू इच्छितो परंतु मला त्यात काही वेळ लागेल. आज देवू शकतो परंतु मला थोडा वेळ लागणार आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, अति.आयुक्त यांनी माहिती दिली की ८० टक्के खाटांच्या अंमलबजावणी करिता त्या ठिकाणी ऑडीटर नेमले होते. त्याची यादी उपलब्ध होत असेल तर कुठला रुग्ण , कुठल्या कोटयामध्ये भरती झाला असेल तो २० टक्के मध्ये झाला की ८० टक्केमध्ये बेड प्राप्त झाला याची जर प्रशासनाकडे यादी उपलब्ध असेल तर देण्यात यावी.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, फ्री ऑडीटर जे होते त्यांची आम्ही ट्रेनिंग केली होती आणि ट्रेनिंग करतांना त्यांना आम्ही निर्देश दिले होते की जे काही अॅडमीशन असेल आणि त्या अॅडमीशनचा डीसचार्ज असेल तो ८० टक्के मध्ये जे लोक भरती झालेले आहेत त्या लोकांची आपण यादी तयार करावी त्या लोकांचा डिसचार्ज करतेवेळी त्यांचे बील चेक करुन शासनाचे ३० ऑगस्ट २०२० चे नोटीफिकेशन आहे त्यानुसार आहे किंवा नाही याला प्रमाणित करुन त्या पेशंटला दयावे आणि हॉस्पीटलला सुध्दा माहिती दयावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. अशा रुग्णालयांची यादी आहे काय? एका हॉस्पीटलला १०० खाटा आहेत एखाद्या तारखेला त्या ८० टक्के कोटयामध्ये किती रुग्ण रुग्णालयात दाखल झाले त्याची यादी आहे काय? जर त्या हॉस्पीटलमध्ये ८० बेड पैकी १० बेड खाली असतांना सुध्दा त्यांनी २० टक्के मध्ये

रुग्ण भरती करुन घेतले असेल तर त्यावर नियंत्रण करणारी यंत्रणा नागपूर महानगरपालिकेकडे आहे काय?

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी,ॲडमीशन करतांना रुग्णांलयांना अशा प्रकारचे कोणतेही निर्देश नव्हते की त्यांना ८० टक्के मध्ये करायचे की २० टक्के मध्ये भरती करायचे. १५ सप्टेंबर २०२० दिलेल्या सर्क्युलरप्रमाणे कोणताही रुग्ण असेल त्याला प्राथमिकता जे आपले सेंट्रल कॉल सेंटर आहे त्या ठिकाणी कॉल करुन ॲडमीशन करीत असेल तर त्याला प्राथमिकता ही ८० टक्के मध्ये द्यावयाची आहे. जर ८० टक्के मध्ये बेड उपलब्ध नसेल तर त्या व्यक्तीला त्या हॉस्पीटलची जबाबदारी होती त्यांनी पुर्ण जे रेट आहेत, जे चार्जेस राहणार त्याची जानकारी देवून त्याला ॲडमीशन करुन घ्यावयाचे होते.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, महानगरपालिकेचे कॉलसेंटर कोणत्या तारखेला स्टॅबलीश झाले आणि सेंट्रलाईज ॲडमीशन सिस्टीम महानगरपालिकेने कोणत्या तारखेली कार्यान्वित केली आहे. अशा पध्दतीचे प्रशासनाचे उत्तर देवून चालणार नाही. या शहरात मोठया प्रमाणात लुटालुट झालेली आहे. अनेक हॉस्पीटलचे ६-७ लाखाचे पॅकेज होते तर काही ठिकाणी ३-४ लाखाचे पॅकेज होते आणि यावर प्रशासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नव्हते. जे ऑडीटर बसविण्यात आले होते त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नव्हते ते एजी ऑफीसचे ऑडीटर होते त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी महानगरपालिकेची कुठलीही यंत्रणा नव्हती. रुग्णालयात रुग्ण भरती व्हायला गेला की ८० टक्के मध्ये बेड उपलब्ध आहे याची माहिती जर त्याला मिळाली तर ठीक आहे. मात्र त्याला सांगितले की ८० टक्के बेड उपलब्धच नाही तर जर बेड उपलब्ध नाही आणि बेड उपलब्ध करुन घ्यायचे असेल तर २० टक्के मध्येच बेड उपलब्ध करुन घ्यावे लागेल असे जर सांगितले जात असेल तर त्याला नाईलाजाने २० टक्के मध्ये भरती घ्यावे लागत होते. याकरिता महानगरपालिकेने काय तयारी केली होती तर कुठलीही तयारी केली नाही. हे जे उत्तर देत आहे ते मोघम देत आहेत म्हणून मा.महापौरजी, या संपुर्ण प्रकरणांमध्ये जेवढया तक्रारी आल्या. एवढी मोठी यंत्रणा उभारली. तर काय फक्त २ लक्ष ४४ हजार परत देण्याचे आदेशित केले आहे. हा काय प्रकार आहे मा. महापौरजी, ८० टक्केकरिता ४१ तक्रारी आल्या त्यापैकी फक्त २ लक्ष ४४ हजार आपण परत करण्याचे आदेशित केले आहे हे कसे शक्य आहे मा.महापौरजी.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, यामध्ये मी सांगू इच्छितो की जे फ्री ऑडीटर होते.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ही यंत्रणा नसल्यामुळे या शहरातील नागरिकांची मोठया प्रामाणात लुट झाली आहे. पेन्डामीक काळामध्ये हॉस्पीटल असे कसे आपल्या मर्जीनुसार नागरिकांना ॲडमीट करुन दर निश्चित करुन घेवू शकेल. या पेन्डामीक काळामध्ये सर्व अधिकार मा.आयुक्तांकडे प्रदीप्त आहेत. आपल्या त्या संपुर्ण अधिकाराचा वापर करुन नियंत्रण आणणे गरजेचे होते. आता तुम्हांला सांगतो, या संपुर्ण प्रकरणांत मा. हायकोर्ट महानगरपालिकेचे प्रशासन चालवून राहीले. प्रत्येक गोष्टीत दिशानिर्देश, आता महानगरपालिकेने सेंट्रलाईज कन्ट्रोल रुम स्थापित केली पाहिजे असे मा. हायकोर्टाने निर्देश दिले आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून ॲडमीशन झाले पाहिजे हे हायकोर्ट सांगते. शासनाचे निर्देश आहे त्या निर्देशाची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिका प्रशासन करीत नाही.

श्री.अविनाश ठाकरे:-पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मा.प्रफुल्ल गुडधे यांनी जो प्रश्न उचलला त्यावर मला एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. मा.हायकोर्टाने कुठल्या वस्तुस्थितीला आधारित महानगरपालिकेला कोव्हीड सेंट्रल रुम स्थापित करण्याचे आदेश दिले. त्याच्यामध्ये कलेक्टर आणि महानगरपालिकेला इन्व्हॉल करण्याचे कारण

काय? कलेक्टर आणि नागपूर महानगरपालिका या दोघांनी मिळून करावे हे हायकोर्टाने कुठल्या वस्तुस्थितीला आधारित असे आदेश दिले. महानगरपालिकेने स्वत: एफीडेव्हीट केले होते काय की कलेक्टर आणि महानगरपालिका मिळून हे कोव्हीड सेंट्रल रुम स्थापित करणार. त्याच्यानंतर हायकोर्टाने आदेश दिले काय? याच्या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

महापौर:- प्रशासनाने प्रफुल्ल गुडधे यांच्या प्रश्नाचे उत्तर दयावे त्यानंतर अविनाश ठाकरे यांच्या उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर दयावे.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी,मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे यांनी मुद्दा उपस्थित केला की फ्री ऑडीटरवर कुणाचे कंट्रोल नाही. मी सांगू इच्छितो की जो फिगर दिला होता २ लक्ष रुपयांचा तो जानेवारी महिन्यात आलेल्या कंम्प्लेंटच्या बाबतचा आहे. तेव्हा आमच्याकडे कमी रुग्ण होते. जो फिगर दिला आहे तो त्या कंम्प्लेंटच्या कम्प्लॅन्सच्या बाबतीतील आहे. त्यांनी दुसरा प्रश्न विचारला होता किती कंम्प्लेंटस् आलेल्या आहेत. त्यानंतर जानेवारी महिन्याचे आतापर्यंत फिगर दिले होते. याच्या व्यतिरिक्त जे फ्री ऑडीटर नेमलेले आहेत. सगळया हॉस्पीटलमध्ये नेमलेले आहेत त्यांच्याकडून जवळपास १५ हजार दोन महिन्यामध्ये, सेकंड वेवच्या बाबतीत सांगायचे तर मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यामध्ये १५ हजार बील त्यांनी तपासलेले आहे. त्यापैकी ८० टक्क्याचे बील होते त्यापैकी १७ लक्ष रुपयाची जी तफावत होती काढलेली आहे त्यापैकी ऑलरेडी १३ लक्ष रुपये लोकांना जे हॉस्पीटलॉईज झाले होते त्यांना परत केले आहे. मागच्या वर्षीची जी लाट होती त्यामध्ये १ कोटी ९ लक्ष रुपयाची जी बील तफावत होती जे फ्री ऑडीटर यांनी काढले होते ते जे रुग्ण होते त्यांना परत करण्यात आले होते. याच्या व्यतिरिक्त त्यांचा दुसरा उपप्रश्न होता, सेंट्रल कोव्हीड रुम केव्हा पासून सुरु झाला. महानगरपालिकेमध्ये जो सेंट्रल कोव्हीड रुम होता तो ऑगस्ट २०२० मध्ये सुरु झाला होता परंतु हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे ५ मे २०२१ ला एक नवीन सेंट्रल रुम म्हणून उघडण्यात आले होते. त्यामध्ये हायकोर्टाने बघितले की कोणत्या प्रकारची सेंट्रल ॲडमीशन प्रक्रिया चालू आहे. त्याचा लाभ ग्रामीण भागातील हॉस्पीटलमध्ये तशाप्रकारची ॲडमीशन प्रक्रिया झाली पाहिजे याच्या सोबत जे त्या वेळेला बेड, रेमिडेसिवीर इंन्जेक्शन आणि ऑक्सीजन या दोन वस्तुचा तुटवडा निर्माण झाला होता. ते तिघेही खुप क्रिटीकल विषय होते. त्यामुळे यामध्ये कंबाईन करुन एकाच जागेत बसुन एकच कंबाईन आर्डर काढून कलेक्टरसाहेब आणि मा.आयुक्त साहेब यांचा जांईट आर्डर काढला होता सेंट्रल रुम स्थापित करण्याचा आणि त्यावेळेला याचा रिपोर्ट जो आहे तो दोन नोडल ऑफीसरमार्फत देण्यात येत आहे आणि यासोबत मा.हायकोर्टला सुध्दा याची पुर्ण कल्पना दिली जाते. काल सुध्दा मा.हायकोर्टामध्ये सुनावणी झालेली आहे त्यामध्ये मा.हायकोर्टाने ही जी कार्यप्रणाली चालू आहे त्याच्यावर समाधान व्यक्त केले आहे.

महापौर:- अविनाश ठाकरे यांचा प्रश्न होता मा.हायकोर्टाने जे सेंट्रल रुम स्थापित करण्यास सांगितले होते त्यामध्ये मा.अविनाश जी आपण सांगावे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा होता की मा. हायकोर्टाने आपल्याला कोव्हीड कंन्ट्रोल रुम स्थापित करण्याचे निर्देश दिले त्याकरिता आपण मा.हायकोर्टाला एफीडेव्हीड दिले होते की नागपूर महानगरपालिका कोव्हीड कंन्ट्रोल रुम स्थापित करीत आहे की मा. हायकोर्टाने असे निर्देश दिले आहे की तुम्ही कोव्हीड कंट्रोल रुम तयार करावे.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, आमच्या कडे जो कोव्हीड कंट्रोल रुम होता तो अगोदरपासून सुरु होता. परंतु जेव्हा मा. हायकोर्टाने याची जेव्हा विचारणा केली तेव्हा आम्ही त्यांना याची वर्किंग सांगितली. हे दोन वेगवेगळे विषय होते. वेगवेगळया विषयावर सुनावणी चालू होती. हे तीन क्रीटीकल विषय होते त्यामध्ये एक चौथा विषय म्युकरमायसिसचा इन्क्ल्युड करुन हे चार विषय होते यांना कंबाईन करुन कंट्रोल रुम संपुर्ण नागपूर जिल्हयाकरिता तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्या आधारावर मा. कलेक्टर साहेब आणि मा.आयुक्त साहेब एक नव्याने जाईंट आर्डर काढून त्यामध्ये वेगवेगळे एसओपी तयार करुन, कार्यप्रणाली तयार करुन मा. हायकोर्टाला सुध्दा सोपविली होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ८० टक्क्यामध्ये १५ हजार रुग्णांची जी संख्या होती त्याची यादी महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे काय?

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी,मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधेयांचा जो प्रश्न आहे. त्याची यादी फ्री ऑडीटर आणि आमच्याकडे उपलब्ध होती. आमच्याकडे यादी तयार केली होती परंतु त्यामध्ये असे निदर्शनास आले होते की त्यात थोडा प्रश्न निर्माण होत आहे. आमच्याकडे जे आकडे होते त्यामध्ये पुर्णपणे अ‍ॅक्युरेट आकडे करण्याकरिता परत आम्ही सगळया हॉस्पीटलकडून सविस्तर माहिती मागितली होती. ज्यामध्ये तीन कॅटेगिरी आहेत ८० टक्के, २० टक्के आणि इन्शुरन्स या तीन प्रकारच्या कॅटगिरीमध्ये ज्या अ‍ॅडमीशन होतात याची सविस्तर माहिती १७ मे २०२१ ला ऍपिडेमिक अ‍ॅक्टखाली निर्देशित करुन मागितली होती. त्याबाबत हॉस्पीटल असोसिएशन आणि इंडियन मेडीकल असोसिएशन यांनी थोडे नकारात्मक उत्तर दिले होते. याची जाणीव सुध्दा हायकोर्टाला मिळाली तेव्हा त्यांनी कालच्या हिअरिंगमध्ये त्यांना निर्देशित केले आहे की अशा प्रकारची माहिती लपविता येत नाही, लवकरच ही माहिती दयावी. त्यामध्ये जेष्ठ सदस्यांचा जो प्रश्न आहे तसाच आमचा सुध्दा प्रश्न आहे की एक पुर्ण जे कॅलक्युलेशन आहे प्रत्येक प्रकारची तयारी करण्याकरिता आणि जनतेचे प्रश्न सोडविण्याकरिता मदत होईल. आम्ही अपेक्षा करतो की सगळे हॉस्पीटल माहिती देणार. मी आणखी सांगू इच्छितो की २२ हॉस्पीटलने आतापर्यंत आम्ही जो फॉरमेट दिलेला आहे त्याच्या मध्ये माहिती दिलेली आहे

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, आताच अपर आयुक्त श्री. शर्मा साहेबांनी माहिती दिली. त्याप्रमाणे ८० टक्के आणि २० टक्के हा जो विषय आहे. अनेक हॉस्पीटलमध्ये ८० टक्के मध्ये बेड उपलब्ध नसल्याचे सांगून २० टक्केमध्ये सगळया रुग्णांना अ‍ॅडमीशन देवून त्यांचे बील काढले आहे. मा.महापौरजी, आपल्याला माझी विनंती आहे पुर्ण झोनशहा आणि शहराला आव्हान केले तर प्रत्येक झोनमध्ये त्या त्या भागातील हॉस्पीटलच्या तक्रारी मागवून घेतल्या तर त्या प्रकरणांमध्ये ८० टक्के आणि २० टक्के चा जो घोळ आहे तो प्रशासनासमोर येईल आणि आपल्या समोर येईल. मोठया प्रमाणात हॉस्पीटलमध्ये प्रत्येक नागरिकांना २० टक्के अंतर्गत फार्म भरुन घेतले त्यांच्या नातेवाईकाकडून एफीडेव्हीट सारख्या फॉरमेटमध्ये फार्म भरुन घेतले आणि नंतर त्यांना सांगितले की २० टक्के मध्ये अ‍ॅडमीट करुन घेतले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ही जी यादी आहे ती पुढच्या सभेमध्ये ती उपलब्ध होवू शकली तर ८० टक्के मध्ये असलेल्या लोकांच्या यादीत लक्षात येईल की किती लोकांना सरसकट २० टक्के मध्ये अ‍ॅडमीट केले आहे. याच्या मध्ये रुग्ण प्रत्येक वेळी सांगते की २० टक्क्यामध्ये अ‍ॅडमीट केलेले आहे. एकही रुग्ण ८० टक्केमध्ये अ‍ॅडमीट केलेला गेला नाही. त्यामुळे ही यादी समोर आली पाहिजे ही आमची मागणी आहे आणि दुसरा प्रश्न आहे २३ मार्च २०२१ ला

कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने राज्य सरकारने मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. कोव्हीड-१९ रुग्णांची भरती, यांच्या अॅडमीशनची प्रक्रिया कशापध्दतीने केली पाहिजे. या पध्दतीचे शासननिर्णय काढलेले आहे. मार्गदर्शक तत्वे रिसीव्ह केले होते. त्या मार्गदर्शक तत्वानुसार त्या डेलीकेटेड क्षेत्रामध्ये कुठला रुग्ण असला पाहिजे, डेलीकेटेड हॉस्पीटलमध्ये कुठला रुग्ण असला पाहिजे, कोव्हीड हेल्थ सेंटरमध्ये कुठला असला पाहिजे, ऑक्सीजन कुठल्या रुग्णाला दिले पाहिजे, वेंटीलेटर कुठल्या रुग्णाला आवंटीत केला पाहिजे या संदर्भातील त्यात मार्गदर्शक सुचना निश्चित केल्या होत्या. रुग्णांचे वर्गीकरण कसे करायचे, बेडचे वर्गीकरण कसे करायचे, बेडचे वाटप कसे करायचे, टेस्टिंगच्या संदर्भातील काय नियमावली आहे, ऑक्सीजनचा पुरवठा कसा आहे, औषधाचा पुरवठा कसा आहे. विलगीकरणाच्या संदर्भात सुध्दा काही निकष आणि नियम निश्चित करुन दिले होते. त्या संपुर्ण निकष आणि नियमांचा आणि मार्गदर्शक सुचनांचा अवलंब नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाने केला काय ? असा माझा प्रश्न होता.

श्री.जलज शर्मा(अपर आयुक्त):- मा.महापौरजी, शासनाच्या वेळोवेळी आलेल्या निर्देशाप्रमाणे आम्ही त्या हॉस्पीटलमध्ये अंमलबजावणी केलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मी उदाहरण दिलीत आपण नाही केले त्या संदर्भात मा. महापौरजी आपण काय करणार आहे.

महापौर:- आपण उदाहरण सांगावे. त्याचे गांभीर्य घेवून आपण कार्यवाही करु.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मी वाचून दाखवितो (वाचले) होम आयसोलेशन परवानगी महानगरपालिकेने दिली काय? ते देणे बंधनकारक होते काय? की ती ऐच्छिक बाब होती काय? त्याची इच्छा आहे म्हणून तो घरी राहून आयसोलेट राहू शकतो असे काही दिशानिर्देश होते काय ? आणि त्यावर महानगरपालिकेने कशाप्रकारे अंमलबजावणी केली असा माझा प्रश्न होता.

महापौर:- लोकांना होमआयसोलेशन मध्ये राहण्याचे कुणी निर्देश दिले आणि त्यात महानगरपालिकेची काय भुमिका होतीअसे त्यांचे म्हणणे आहे.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. होमआयसोलेशनवर आताच जेष्ठ नगरसेवकांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबद्दल पूर्वीच्या गाईडलाईनप्रमाणे पॉझीटीव्ह पेशंटला होम आयसोलेशन करावयाचे होते त्याप्रमाणे शासनाने एक धोरण स्विकारले होते. त्याप्रमाणे होम आयसोलेशनला प्रारंभ केला तोपर्यंत आपण डिस्टन आयसोलेशनलाच निर्देशित करण्यात आले होते. त्यानंतर होम आयसोलेशनला शासनाने परवानगी दिली त्यानंतर होम आयसोलेशनसाठी आरआय टीमला सुध्दा या गाईडलाईनप्रमाणे सुचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे होम आयसोलेशनच्या पेशंटला आरआय टीमने भेट देवून त्यांची परिस्थिती जाणून घेवून त्याप्रमाणे त्यांना औषधे देणे तसेच या होम आयसोलेशन असलेल्या इमारतींना प्रोटेक्शन देणे याचा उल्लेख होता. त्याबाबत कटाक्षाने पालन करण्याचा प्रयत्न करतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, होम आयसोलेशनमध्ये परवानगी दिलेल्या रुग्णांची संख्या किती आहे.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. आमच्या कडे अशी संख्या नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आपण परवानगी किती लोकांना दिली आहे. ९५ टक्के जास्त असलेल्या व्यक्तिला गृह विलगीकरणाच्या अटी मान्य करण्याची तयार असेल तर गृह विलगीकरणाची परवानगी दयावी. नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाने अशा किती रुग्णांना परवानगी दिली.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. लेखी स्वरुपात देण्याची काही संख्या नव्हती.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आपण डाटा मेन्टेन केला असेल.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. जवळपास ९५ टक्के पेक्षा जास्त लोकांना होम आयसोलेशन करण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामध्ये जे निकष आहेत ९४ ची ऑक्सीमीटर लेव्हलच्या ज्या काही बाबीं आहेत त्या शासन निर्णयामध्ये देण्यात आल्या आहेत.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ८५ टक्के असे काही शासनाची गाईडलाईन वगैरे होती काय?

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. शासनाची गाईडलाईन अशी होती की ज्यांचा ९४ पर्यंत ऑक्सीजन लेव्हल आहे. इतर कायटेरियामध्ये जे बसत नाही त्यांना तुम्ही होम आयलोशन अलाऊ करु शकता. ज्यांना होम आयसोलेशनची परवानगी दिली होती त्यांची संख्या ९५ टक्के होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, तुम्ही अशा प्रकारे कोणत्याही होम आयसोलेशनच्या परवानगी दिलेल्या नाहीत. कोणताही माणुस त्या काळामध्ये त्यांच्या घरी पोहचत नव्हता. ऑक्सीमीटरवर त्याची ऑक्सीजन लेव्हल कुणी तपासत नव्हता. जर त्याची ऑक्सीजन लेव्हल ९५ टक्के पेक्षा कमी असेल तर आपल्याकडे त्याची काय व्यवस्था होती.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. साधारणत: ज्या गाईडलाईन, ज्या सुचना होत्या त्या गाईडलाईनप्रमाणे असिमटेनीक असलेल्या पेशंटला होम आयसोलेशन मध्ये राहण्याची परवानगी देण्यात आली होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, जर एखाद्याला सिमटन आहे आणि त्याची ऑक्सीजन लेव्हल ९५ च्या खाली गेली तर आपल्याकडे काय यंत्रणा आहे. त्या पेशंटला सर्दी आहे, खोकला आहे आणि तो होम आयसोलेशनमध्ये आहे त्यासाठी आपली काय यंत्रणा होती.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. प्रत्येक होम आयसोलेशन असलेल्या रुग्णालयापर्यंत पोहचण्याकरिता प्रत्येक झोन निहाय आपण आरआय टीम अरेंज केल्या होत्या त्यांच्यावर सुपरविजन करण्याकरिता आपले मेडीकल ऑफीसर होते. प्रत्येक झोन मध्ये उपलब्ध असलेल्या दुरध्वनीवरुन कंट्रोल रुमवरुन संपर्क करण्यात येत होता. या सगळया माध्यमातून त्यांच्यावर देखरेख करण्याचा प्रयत्न करीत होतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आपण दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. या दोन महिन्यामध्ये मृत्यूचे तांडव या शहरात सुरु होते. जी माहिती जोशी साहेब सांगत आहे ती स्थिती या शहरामध्ये नव्हती. अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही आमच्या झोनमध्ये होत नव्हती. दुस-या नगरसेवकांच्या झोन मध्ये होत असेल तर त्यांनी सांगावे.

असे काही उदाहरण आहेत काय? अशी कोणतीही कार्यवाही होत नव्हती. होम आयसोलेशनमध्ये आपण सुट दिली. ९५ टक्के लोकांच्या घरी व्यवस्थाच नाही होम आयसोलेशनची, ती परवानगी देत असतांना ज्यांच्याकडे स्वतंत्र घर आहे, ज्यांच्याकडे स्वतंत्र टायलेट आहे, स्वतंत्र खोली आहे अशा लोकांना परवानगी द्यायची होती. अशी काही व्यवस्था नसतांना महानगरपालिका प्रशासनाने लोकांना त्यांच्या भरवशावर सोडून दिले, तुम्ही जगा, मरा. सरकारी, खाजगी रुग्णालयामध्ये बेड मिळाला नाही तर तुम्ही जबाबदार अशाप्रकारे या नागपूर शहरातील सर्व नागरिकांना सोडून दिले होते. आपण जे उत्तर देत आहे ते संपुर्ण चे संपुर्ण उत्तर दिशाभूल करणारे आणि चुकीचे आहे. या कोणत्याही गोष्टी या दीड महिन्यामध्ये घडलेली नाही. मागच्या मार्च महिन्याच्या सभागृहामध्ये सुध्दा कोव्हीडच्या विषयाच्या संदर्भात स्थगण प्रस्ताव काही सदस्यांनी आणला होता. त्यावर विस्तृत चर्चा झाली होती. त्या स्थगण प्रस्तावावर आपण अत्यंत सकारात्मक पध्दतीने प्रशासनाला निर्देश दिले होते. या संपुर्ण राज्य सरकारच्या गाईलाईन, सुचना आहेत त्यानुसार कोव्हीडला निपटण्यासाठी आपण तयारी केली पाहिजे. प्रशासनाच्या माध्यमातून कोणतीही तयारी झालेली नाही. लोकांना कुणाच्या भरवशावर सोडून दिले होते. अनेक लोक मृत्यूमुखी पडले. जो आकडा समोर आला आहे त्यामध्ये सुध्दा तफावत आहे. जवळपास रोज ४५० ते ५०० नागरिकांचा मृत्यू होत होता. काही रुग्ण कोव्हीड झाल्यानंतर पोस्ट ट्रिटमेंट बरोबर झाले नाही म्हणून सुध्दा मृत्यू पावले आहेत. साधारणत: ४५० ची संख्या होती आपल्या कडे रेकार्ड फक्त १०० रुग्णांचा होता. कोव्हीडच्या मॅनेजमेंटच्या संदर्भात आपल्या महानगरपालिका प्रशासन पुन्हा उपेक्षित ठरले. कोणत्याही गोष्टी नागपूर महानगरपालिकेच्या नियंत्रणात राहिल्या नाही. मा.महापौरजी, जे आकडे प्रत्यक्षात जनतेसमोर यायला पाहिजे ते सुध्दा आपण लपवून राहिले आहे. याला कोणकोण जबाबदार आहेत. मा.महापौरजी, जे लोक गेले त्याला आपण श्रध्दांजली अर्पण केली. त्यांचे दु:ख त्यांना सहन करण्याची शक्ती परमेश्वर त्यांना प्रदान करो ही कामना आपण केली. परंतु त्यांचे दु:ख त्यांचे ठिकाणी आहे मला माहीत आहे.आपण कुठल्याच यंत्रणा आपण करु शकलो नाही.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी. तुमची परवानगी असेल तर मी काही माहिती देवू इच्छितो, कोव्हीड रुग्ण ज्या लोकांना बेड मिळाले नाही ते घरात तडफडून मरण पावले. शेवटी त्यांचा अत्यंविधी करण्याकरिता सुध्दा महानगरपालिकेकडून जसे सहकार्य पाहिजे होते ते सहकार्य मिळालेले नाही. आमचा झोन क्र. ७ करिता अन्याय आहे. मा.महापौरजी, तुमची परवानगी असेल तर मी उदाहरण देतो. माझ्या घराजवळ एक आजीबाई राहतात बहादुरे त्यांचे नाव आहे त्या मरण पावल्या. त्यांच्या अत्यंविधीकरिता कुणी येवू शकले नाही. कोव्हीड पेशंट पॉझिटीव्ह असल्यामुळे आजूबाजूचे लोक सुध्दा येवू शकले नाही. त्यांच्या अत्यंविधीकरिता मला खुप संघर्ष करावा लागला. कोव्हीड पेशंटचा मृतदेह नेण्यासाठी रात्रभरापासून दूपारी ४ वाजेपर्यंत शववाहिनीकरिता मला संघर्ष करावा लागला.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, हा विषय मी इन्फोमेशन करिता मागितला होता. बेसिकली माहिती मिळाली परंतु पुर्ण माहिती मिळाली नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, प्रफुल्लजी यांना हरकत नसेल तर एक प्रश्न विचारावयाचा होता.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मला काही हरकत नाही. परंतु प्रशासन जे उत्तर देणार आहे ते दिशाभूल करणारे उत्तर राहणार आहे. महानगरपालिकेचे प्रशासन मा.उच्च न्यायालय चालवून राहिले. प्रत्येक गोष्टीमध्ये दिशानिर्देश देत आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मला बोलण्याची परवानगी हवी आहे. या हॉस्पीटलच्या बीलाच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. त्याच्यात काही आदेश दिले गेले आहे. मला असे वाटते मा.उच्च न्यायालयाने या सर्वांची बील कलेक्टरला देवून त्याची प्रत मा.उच्च न्यायालयात दयावी असे काही आदेश दिले गेले आहेत या बाबतीतील माहिती महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे आहे काय?

महापौर:- प्रशासनाने माहिती दयावी.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. मा.दटके साहेबांनी जे म्हटले आहे. मुंबई बेंचने अशा प्रकारचे आदेश दिले असेल ते आदेश आमच्यापर्यंत आलेले नाहीत मात्र नागपूर बेंच मध्ये जी सध्या पीटीशन सुरु आहे सु मोटो त्यामध्ये जे निर्देश देण्यात आले आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी,पाईंट ऑफ इन्फोंमेशन. यांच्याकडे माहिती नसेल तर यांनी ती माहिती मागविली पाहिजे. मा. माजी मुख्यमंत्री आता जे विरोधी पक्ष नेते आहेत आदरणीय देवेंद्रजी फडणवीस असतांना मुख्यमंत्री आरोग्य सहायता सेलयाचे प्रमुख होते शेंडे यांनी जी याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्या संबंधीत आदेश देण्यात आले आहेत. माझी माहिती अशी आहे ती तपासून पाहावी. मा.मुख्य न्यायाधिश महाराष्ट्र मुंबई खंडपीठासमोर याचिका दाखल झाली होती. प्रशासनाला माहिती नसेल तर माहिती कळवून घ्यावी. ती माहिती आपल्या जवळ ठेवावी. जेणेकरुन नगरसेवकांना आपल्या माध्यमातून कळेल.

श्री.राम जोशी(अपर आयुक्त):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. माहिती प्राप्त करुन देण्यात येईल.

महापौर:-या विषयाच्या संदर्भात मा.सत्तापक्षनेते श्री.अविनाशजी ठाकरे, मा.सदस्य, श्री.प्रविणजी दटके, मा.सदस्य,श्री. प्रफुल्लजी गुडधे व मा.सदस्य, श्री नितीनजी साठवणे इन सभी लोगो ने इस विषय पर सखोल चर्चा की यह विषय अत्यंत गंभीर है, और इस गंभीर विषय पर भी नागपूर महानगरपालिका ने अपनी पुरी सक्षमता के साथ मे अहोरात्र परिश्रम किया है इस बात मे किसी प्रकार का कोई शक नही है। आंकडे उपलब्धता को लेकर के जो प्रफुल्लजी ने प्रश्न खडा किया, मा.अति.आयुक्त ने अपना उत्तर देते समय स्वयं कहा कि, जो आंकडे उपलब्ध थे, उससे वह संतुष्ट नही थे, इसलिये उन्होने फिरसे अस्पतालवालो को पत्र लिखा कि,आप हमे पुरे आंकडे दिजीये, कारण इन आंकडो से हम संतुष्ट नही है, और अस्पतालवालो ने इसके विरोध मे आंकडे देने से मना किया और वह कोर्ट की शरण मे गये तो कोर्ट ने निर्देश दिया कि, आंकडे आपको देना पडेगा इसका मतलब है कि, प्रशासन की मंशा आंकडो को छिपाने की नही है, यह इस बात से जाहिर होता है। मैं एक करबध्द निवेदन प्रफुल्लजी से करना चाहुंगा कि, उन्होने सभागृह मे वक्तव्य कर दिया कि एक दिन मे ४५० से लेकर के ५०० लोगो की मृत्यु हुई है, मेरे पास यथार्थ आंकडा तो नही है लैकिन जो आंकडा अखबारो मे छपा है, उन अखबारो मे छपे हुऐ आंकडो के अनुरुप गत २ माह मे ७५०० लोगो की मृत्यु का आंकडा अखबारो मे छपा है, अगर प्रतिदिन ४५० लोग मरते तो यह आंकडा कितने बडे प्रमाण मे जाता था, इसलिये प्रफुल्लजी जैसे सिनिअर नगरसेवक ने महानगरपालिका के स्वास्थ विभाग से एक्च्युअल आंकडा लेकर के अपना वक्तव्य करना चाहिये, कारण प्रफुल्लजी यहां जो वक्तव्य करेगें वह आनेवाले नगरसेवक पिढी दर पिढी पढते रहेंगे, और आपके वक्तव्य मे वह आंकडा आयेगा और आप एक सिनिअर नगरसेवक है, प्रतिदिन अगर ४५० का आंकडा उन्होने कहां तो दो महिने के आंकडे की बेरीज लगाईये, और महानगरपालिका के माध्यम से इन दो महिने

मे साडे सात हजार लोगो की मृत्यु हुई है, ऐसा अखबार मे कहां है, अगर अखबार ७५०० लिख रहा है और आप रोज ४५० कह रहे है तो आप कल्पना किजीये कि, कितने गलत आंकडे को आप सभागृह के सामने रख रहे है, आप एक जिम्मेदार नगरसेवक है, एक सिनिअर नगरसेवक है, जिनके तरफ यह शहर एक नेतृत्व की दृष्टीसे देखता है, और आपका यह वक्तव्य जब सभागृह के पटल पर लिखा जायेगा इसको आनेवाली पिढी जब नगरसेवक के रुप मे पढेगी तो गलत वक्तव्य को न पढे इसलिये दुबारा आंकडा देते समय आप संजीदगीसे कहे ऐसा मेरा करबध्द आपसे निवेदन है। प्रफुल्लजी ने जो सूचना करी, ८० प्रतिशत की यादी आनेवाले सभागृह मे सभागृह के पटल पर रखी जाये, हम कोर्ट के निर्देश की प्रत के साथ संबंधित सभी अस्पतालवालों को पत्र देकर के एक निश्चित अवधी के अंदर वह यादी जमा करे, वह सभागृह के पटल पर रखे। मा.प्रविणजी ने जो विषय रखा, वह इस शहर की दृष्टीसे पुरे महाराष्ट्र की दृष्टीसे संजीदगीपुर्ण विषय है, कोर्ट ने स्पष्टरुपसे निर्देश दिये है कि, महाराष्ट्र सरकार की गलती के कारण अगर अस्पताल ने शोषण किया है तो ऐसे सारे के सारे बील कोर्ट के पास जमा किये जाये, ऐसे स्पष्ट निर्देश है,और मा.प्रफुल्ल गुडधेजी जो बार बार कह रहे है कि, कोर्ट महानगरपालिका चला रहा है, प्रुफुल्लजी महानगरपालिका के कंट्रोल रुम की व्यवस्था देखने के बाद महानगरपालिका की कार्यप्रणाली की उपलब्धी समझने के कारण कोर्ट ने यह निर्देश दिये कि ग्रामीण मे भी यह व्यवस्था होनी चाहिये, और वह व्यवस्था का संचालन नही कर सकते इसलिये महानगरपालिका ने उसका भी संचालन करना चाहिये, यह महानगरपालिका की कार्यप्रणाली सकारात्मक स्थापित करने का काम मा.न्यायालयने किया है यह इस बात से प्रतिपादीत होता है और रही बात आप पुरे माहभर के कोर्ट के निर्णय पढिये जिसमे अगर चार दिन कोर्ट ने महानगरपालिका को गालिया दी है तो २६ दिन राज्य सरकार की कार्यप्रणाली को गालिया दी है, अगर आप के मुख से वह भी निकलता तो सभागृह के साथ न्याय होता ऐसा मुझे लगता है। आप केवल और केवल नागपूर महानगरपालिका का नाम लेकर के अनावश्यक राजनैतिक वक्तव्य कर रहे है, प्रफुल्लजी की जो मांग है, ८० प्रतिशत की यादी प्रकाशित होनी चाहिये, वह जनता के सामने आनी चाहिये। यह यादी सभागृह के पटल पर रखे। अखबारोने ८ दिन कसीदे कसे है महानगरपालिका के कार्यवाही को लेके, मुंबई, पुणे शहरो से ज्यादा अच्छा काम नागपूर महानगरपालिका ने किया ऐसा अखबारों मे लिखा है जिन्होने हमारे कार्यप्रणाली पर आलोचना की है। आलोचना उनका अधिकार है परंतु अच्छे काम भी वह लिखते है। उसका उजागर भी इस सभागृह मे कर दिया होता तो १० लाख आबादी के अनुरुप पर कॅपीटल के हिसाब से जब निवेदन दिया गया तो मुंबई, पुना से अच्छा काम नागपूर महानगरपालिका ने किया यह प्रतिपादीत करने का काम आकडे के माध्यम से अखबारो मे दिया ।

श्री.प्रवीण दटके :-मा.महापौरजी, आपले अभिनंदन करतो, हे एकमेव असे शहर आहे जेथे १९ लाख टेस्टिंग झाल्या. आपल्या प्रशासनाने, आपल्या कर्मचा-याने १९ लाख टेस्ट केल्या. या महाराष्ट्रात परसेंटनुसार सगळयात जास्त टेस्ट महानगरपालिकेने केल्यात. काही चुका झाल्या असतील परंतु आपल्या कर्मचा-यांनी रात्रदिवस मेहनत करुन कामे केली आहे त्यामुळे १९ लाख टेस्ट झाल्या आहे. आपण आपल्या कर्मचा-याचे अभिनंदन केले पाहिजे. अभिनंदन करण्याचे दिवस नाहीत परंतु १९ लाख टेस्ट हे ३५ लाखाच्या शहरामध्ये ही खुप मोठी गोष्ट आहे. मा.महापौरजी आपल्यातर्फे प्रशासनाचे आणि कर्मचा-यांचे, मेयो, मेडीकल आणि सगळया इस्पीतळातील लोकांचे मी स्वागत करतो.

महापौर:-धन्यवाद दटके साहेब. आपण हा विषय आता संपवू. आपल्या महानगरपालिकेच्या प्रत्येक कर्मचा-यांनी आपण दिलेल्या जबाबदारीचे पालन केले आहे. एखाद-दुसरा जर चुकला असेल तर निगम आयुक्तांनी कार्यवाही सुध्दा केली आहे. हे वारंवार सांगण चांगले नाही. आपण चांगले काम केले हे आपल्या तोंडाने सांगणे बरोबर नाही. मा. प्रफुल्ल गुडधे जो मुळ प्रश्न होता तो पुढच्या सभागृहात घेण्यात यावा. मा. प्रफुल्ल गुडधे हा डिबेटचा विषय नाही आहे.

आपण मुळ विषय मांडला आहे मी बाकी लोकांना बोलण्याचे थांबविले आहे. आपण मुळ विषयाच्या प्रशासनाचा प्रमुख म्हणून आणि या शहराचा प्रथम नागरिक म्हणून निष्पन्न करणार आहे ती माझी जबाबदारी आहे. आपण चुकीचे सांगितले असे मला वाटले तर मी त्याचे निष्पन्न केले आहे आपली जी मुळ मागणी आहे त्याचे मी समाधान करीत आहे त्याचे निर्देश दिले आहे तो पुढच्या सभागृहात येईल. महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचा-यांचे अभिनंदन, महानगरपालिकेने चांगले काम केले आहे. एवढी मोठी जेव्हा त्रासदी होते तेव्हा कुणी माणुस शतप्रतिशत नसतो. कारण आपण शेवटी माणुसच आहो, देव नाही. देवाच्या हातून चुक होते तर आपण माणुसच आहोत. एवढया मोठया त्रासदी मध्ये नागपूर महानगरपालिकेने चांगले काम केले आहे. ज्याप्रमाणे मुंबई पटर्नची चर्चा व्हायची आता नागपूर पॅटर्नची चर्चा होत आहे. ही चांगली बाब आहे तरी सुध्दा मा. प्रफुल्ल गुडधे यांनी मागणी केली आहे ती मागणी जायज आहे. पुढच्या सभागृहात ८० टक्केची यादी सभागृह समक्ष ठेवण्यात यावी.

**<u>प्रश्न क्र. २४९</u>**:- नागपूर शहर मे जितने भी मोबाईल टॉवर बहुत प्रमाण मे लगे हुऐ है और लगाये जा रहे है या संदर्भातील प्रश्न

श्री.राजकुमार साहु:- मा.महापौरजी, नागपूर शहर मे जितने भी मोबाईल टॉवर बहुत प्रमाण मे लगे हुये है और लगाये जा रहे है। उस टॉवर लगानेवाले कंपनीने किसकी परवानगी ली है , अगर ली है तो इनके पास नाहरकत प्रमाणपत्र है क्या ? नागपूर शहर म कितने टॉवर अधिकृत है और कितने टॉवर अनधिकृत है तो उनपर नियमानुसार क्या कार्यवाही की गई है और अभी बिना परवानगी के नागपूर शहर मे बहुत से नये नये टॉवर लग रहे है, उनपर क्या कार्यवाही कर रहे है ऐसा प्रश्न मैने किया है तो प्रशासन की तरफ से मुझे ऐसा उत्तर आया है की नागपूर शहर अंतर्गत कितने टॉवर नागपूर महानगरपालिका के अधिकार क्षेत्र मे आते है इसका खुलासा कर नही सकते। गुंठेवारी क्षेत्र नागपूर महानगरपालिका अधिकार क्षेत्र मे समाविष्ट करने के वजह से इस क्षेत्र मे खडे किये गये मोबाईल टॉवर की संख्या कितने है यह महानगरपालिका को मालूम नही है।

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, राजकुमार साहू एक बहोतअच्छा विषय सभागृह के पटलपर रखा है। नागपूर शहर मे जितने भी मोबाईल टॉवर रेग्युलर किये जा रहे है। उन्होने एक प्रश्न उपस्थित किया है, मेरी जानकारी के मुताबिक नागपूर शहर मे जितने भी टॉवर लगे है उसमे से एकभी टॉवर के परमिशन नही वह सभी बिना परमिशन के लगे है। यह भी एक तथ्य है मा.महापौरजी, और नागपूर महानगरपालिका ऑखमुंद क्यु बैठी है। इतने अतिक्रमण होते है तब अधिकारी क्यु आंखे बंद कर लेते है। मै आपसे अनुरोध करना चाहती हूँ की इस पर पॉलिसी बनना अत्यंत आवश्यक है मा.महापौरजी। जितने भी अनधिकृत टॉवर लगे है उससे नागरिको के स्वास्थ्य पर असर हो रहा है यह वैज्ञनिको ने प्रुफ किया है। जिस जगह जनता टॉवर लगाने का विरोध करती है वहां के टॉवर निकालने के निर्देश दे मा.महापौरजी, और जल्द से जल्द इसकी पॉलीसी तयार करनी चाहिए ऐसे मै निवेदन करती हूँ।

श्री.प्रदीप पोहोणे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, राजकुमार साहू यांनी जो विषय उठाया है वह अत्यंत उचित प्रश्न है। प्रशासन ने उनको ऐसा उत्तर दिया है की वह क्षेत्र गुंटेवारी के अंतर्गत आता है। जिस किसी ने उनको ऐसा उत्तर दिया है उनको मेरी आपके माध्यम से विनंती है की कार्यवाही इसलिये होनी चाहिए की वो क्षेत्र स्मार्ट सिटी के अंतर्गत आता है। और स्मार्ट सिटी के अंतर्गत सारे काम महानगरपालिका के अंतर्गत हो गये। इस प्रकार से किसी नगरसेवक को झुठा उत्तर प्रशासन के तरफ से नही देना चाहिए। मै आपकी तरफ से ऐसा निवेदन करता हुं की ऐसा झुठे

उत्तर देने वाले अधिकारी पर कार्यवाही होनी चाहिए। मा.महापौरजी, जब कोई व्यक्ती काम के लिए एनआयटी की तरफ जाता था तो वह क्षेत्र स्मार्ट सिटी के अंतर्गत आता था, अब एनआयटी वापस हुई तो सारी जो स्मार्ट सिटी अंतर्गत जो भी फाईल है वह नागपूर महानगरपालिका के एडीटीपी विभाग के तरफ है तो इस प्रकार का उत्तर प्रशासनाने ने देना बहोत गलत बात है मा.महापौरजी मुझे लगता है, धन्यवाद।

श्री.नितीन साठवणे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, मोबाईल टॉवरच्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची गाईडलाईन केंद्र सरकारने केलेली नाही आहे. टॉवर लावण्यासाठी या या निकषाचे पालन करणे आवश्यक आहे. नागपूर शहरामध्ये जितके ही टॉवर लागलेले आहे त्या मोबाईल टॉवरला एकही एनओसी उपलब्ध नाही असे माझे म्हणणे आहे मा.महापौरजी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, सन्माननीय सदस्य श्री.राजकुमार साहू यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे मोबाईल टॉवरच्या संदर्भात दिनांक ७.०२.२०१० ला बॉम्बे हायकोर्ट मोबाईल बेंचने पॉलिसी फिक्स करा असे म्हटले आहे. त्या अंतर्गत २६ जुलै २०११ ला पॉलिसी तयार करण्यात आली आणि २०१३ ला सेंटर गर्व्हमेंटने मोबाईल टॉवरच्या संदर्भात काही गाईडलाईन दिल्या. त्या गाईडलाईनच्याआधारे महाराष्ट्र शासनाची नवीन पॉलिसी आली. ४ मार्च २०१४ ला, ती पॉलिसी बॉम्बे हायकोर्टात चॅलेंज करण्यात आली. त्याच्यामध्ये एक आदेश आला १२ सप्टेंबर २०१४ ला की मोबाईल टॉवरवर कोणतीही ॲक्शन घेण्यात येवू नये. १५ मे २०१६ ला सेंटर गर्व्हमेंटने ऑब्टीकल फायबर आणि मोबाईल टॉवरसंदर्भात काही रुल्स आणले. त्याला इन्डीयल टेलिग्राफ लाईफ ऑफ वे २०१६ असे नाव देण्यात आले. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने १७ मे २०१८ मध्ये पॉलिसी आणली. यामध्ये प्रशासनाने १० हजार रुपये घेवून ५ वर्षाची मुदतवाढ दयावी असे म्हटलेले होते. परंतु ही पॉलिसीची प्रस्तावित मोबाईल टॉवरकरिता होती. २९.०१.२०१९ मध्ये सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३२९ अन्वये एक वर्षाच्या अस्थायी स्वरुपाच्या मोबाईल टॉवरच्या संदर्भात ३० हजार रुपये एकमुस्त रक्कम आकारुन मंजूरी देण्याचा ठराव पारीत केला. त्यानंतर या ठरावाला इंडोस्थावर या कंपनीचे ३४१ मोबाईल टॉवर होते त्यांनी चॅलेंज केले. रिट पीटीशन ५६९/२०३० च्या अनुषंगाने २०१८ ला या ठरावावर कोर्टाचा स्टे आर्डर आला. महानगरपालिकेने पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने जी पॉलिसी निर्धारीत केली होती त्यानुसार ३० हजार शुल्क आकारुन अस्थायी मोबाईल टॉवरला नियमित करण्यात यावे.

महापौर:-सध्या आपण कार्यवाही करणार नाही असे शासनाचे किंवा कोर्टाचे आदेश आहेत काय?

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी,१२सप्टेंबर २०१४ चा जो सुधारित आदेश आहे त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की कोणत्याही मोबाईल टॉवरबाबत (वाचले) नागपूर शहर सिमेअंतर्गत एुकण ७७८ मोबाईल टॉवरची नोंद आहे. अस्तित्वात असलेल्या मोबाईल टॉवरला नियमित करण्याबाबत २९.०१.२०१९ मध्ये सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३२९ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या ठरावाअंतर्गत अस्तित्वात असलेल्या मोबाईल टॉवरला परवानगी देण्याची कार्यवाही सुरु आहे. सध्या स्थितीत महापालिकेच्या नगर रचना विभागात रितसर एकुण २२९ व माहितीस्तव एकुण २५० आवेदन प्राप्त झाले असून त्यापैकी २३ मोबाईल टॉवरला तात्पुरती परवानगी देण्यात

आली आहे. तसेच १२ प्रकरणे प्रस्तावित असून त्याच्यावर तांत्रिक पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.

श्री.राजकुमार साहू:-मा.महापौरजी, मेरा विषय है, मेरे विषय पर निर्देश दे मा.महापौरजी। बॉम्बे हायकोर्टने मोबाईल टॉवर निकालने पर रोक लगाई। और जो मोबाईल टॉवर अस्तित्व मे है उनको नियमित किया जाये ऐसे आदेश दिये परंतु नागपूर शहर मे नये नये कुकुरमुत्ते के तरह जो मोबाईल टॉवर तयार हो रहे है। हर जगह घर के आजू बाजू इतने टॉवर लग रहे है की उदाहरण के तौर पर ३०४ टावर हमारे परिसरमे अभी लगे है।

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, या संदर्भात जागेवर जे अनधिकृत बांधकाम आहे ते स्थायी करण्यात आले आहे त्या सर्व अनधिकृत मोबाईल टॉवरबाबत आम्ही रिमायंडर अर्ज दिलेले आहे. त्यांच्याकडून आवेदनपत्र मागवून घेत आहे. त्यांच्याकडून ३० हजार रुपये शुल्क आकारुन नियमित करुन घेत आहे. त्यांना १ वर्षाची अस्थायी परवानगी देत आहे.

महापौर:- २०१४ मध्ये शासनाचे आदेश आले. त्यानंतर नवीन टॉवर लागत आहे. जे टॉवर एक्झस्टींग आहेत त्याबद्दल कोर्टाने निर्देश दिले आहे. सध्या जे नवीन लागत आहे ते लावण्याबाबत अनुमती देण्याचे कोणते कारण नाही आहे. आपण ३० हजार रुपये शुल्क घेत आहे. हे चुकीचे नाही काय? जे लावलेले आहे त्यांच्याकडून ३० हजार घेतले पाहिजे असे सभागृहाचा प्रस्ताव आहे. जे लागलेले टॉवर आहेत त्यांच्याकडून ३० हजार घेण्याच्या प्रस्तावावर जे नव्याने लागत आहेत त्यांच्याकडून ३० हजार रुपये घेवून त्यांना अनुमती देत आहे हे चुकीचे नाही काय?

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, १७.०२.२०१८ मध्ये महाराष्ट्र शासनाची पॉलिसी आलेली आहे. त्या अनुषंगाने १० हजार रुपये ५ वर्षाकरिता नवीन प्रस्तावित मोबाईल टॉवरकरिता अनुमती देता येईल.

महापौर:- याच्यात काही गाईडलाईन दिलेली आहे काय? महाराष्ट्र शासनाची जी गाईडलाईन दिलेली आहे त्यामध्ये असे दिलेले आहे काय की कोणत्या टॉवरला अनुमती द्यायची. कोणत्या घरावरील टॉवरला अनुमती द्यायची.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, प्रस्तावित टॉवरकरिता आहे.

महापौर:- कोणत्या ठिकाणी द्यायचे असे काही नमुद आहे काय? की कुठेही द्यायचे असे नमुद आहे.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, जिसतरह से सन्माननीय अधिकारी महोदयने बताया की नियम के अनुसार दे सकते है। मै प्रशासन से पुछना चाहती हुॅ की टॉवर के संदर्भ मे आजूबाजू के लोगो की तक्रार होगी तो उसका निराकरण होगा की नही होगा।

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, असे फक्त शाळा आणि हॉस्पीटल करिता आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, शाळा आणि हॉस्पीटल करिता काय आहे त्याची सविस्तर माहिती दयावी.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, शाळा आणि हॉस्पीटलच्या इमारतीवर मोबाईल

टॉवरला अनुमती देता येत नाही असे नमुद आहे.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, जर आजूबाजूच्या नागरिकांची तक्रार केली असेल तर प्रशासनाची काय भुमिका राहणार आहे.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, मा.सदस्या श्रीमती आभाताई यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे त्याकरिता रेडिएशन टेस्टिंग करण्यात येते.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, नागरिकांची तक्रार आल्यानंतर कुठेतरी टेस्टिंग केली आहे काय?

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी,त्याची टेस्टिंग टेलिकॉमचे इन्फोर्समेंट डिपार्टमेंटकडून केली जाते.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, टेलिकॉमचे इन्फोर्समेंट डिपार्टमेंट आहे नागपूर महानगरपालिका कडे आजपर्यंत अशा किती तक्रारी आल्या आहेत आणि किती तक्रारी टेलीकॉम इन्फोर्समेंट डिपार्टमेंटकडे रेडिएशन टेस्टिंगकरिता पाठविल्या आहे.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, एक्झॅक्ट आकडा माझ्याकडे नाही आहे. आम्ही दोन तक्रारी पाठविल्या आहेत.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, प्रशासन दिशाभूल करीत आहे. मा.सदस्य श्री. राजकुमार साहू यांचा हा प्रश्न आहे. एडीटीपी विभागाचे प्रशासन हे दिशाभूल करीत आहे. आम्हांला माहीत आहे की नागपूर शहरात जेवढे टॉवर लागलेले आहे आणि जेवढया टॉवरला परवानगी आम्ही तेवढयांना तात्काळ स्वरुपाची परवानगी दिली. त्या टॉवरचा सुध्दा समयसिमा अवधी संपलेला आहे. हे सुध्दा आपल्याला बघावे लागेल मा.महापौरजी. कृपया, राजकुमार साहू आपण बोलावे.

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, २२.०४.२०१९ मे जो विषय सभागृह मे आया था तब तत्कालीन महापौरजी इन्होने रुलिंग दिया था , मेरे क्षेत्र मे जो अवैध टॉवर लगे है उसपर कार्यवाही करने के संदर्भ मे मैने २०१९ पत्र दिया था। उस पर प्रशासन ने अभी तक कोई कार्यवाही नही की है । मेरे परिसर मे गलत तरीके मोबाईल टॉवर लगे है, महानगरपालिका को सुचना किये बिना ही टॉवर लगे है पर मा.हायकोर्टने मोबाईल टॉवर निकाले के लिए तथा इलेक्ट्रिक सिटी काटने के लिए मनाई की है।

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, सदरहू संदर्भात झोन कार्यालयाकडून असे निर्देशित करण्यात येईल. त्यांच्याकडे जे सर्व मोबाईल टॉवर आहेत ते अनधिकृत आहे की अधिकृत आहे त्याबाबतची माहिती सादर करावी. ज्या तक्रारी आल्या आहेत त्या तक्रारी झोनला पाठविण्यात येतील.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, प्रशासनाकडून एक माहिती पाहिजे आहे की नवीन टॉवर उभे करायला कोणकोणत्या एनओसीची गरज आहे. कोणकोणते डाक्युमेंट पाहिजे असतात याची माहिती देण्यात यावी.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, आदरणीय प्रवीणजी दटके यांनी उपस्थित केलेल्या

प्रश्नानुसार परवानगीकरिता खालील प्रमाणपत्र सादर करावी लागतात (वाचले)

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, या सर्व अटीशर्तीसह आपण परवानगी देतो. कोर्टाच्या आदेशानुसार एक वर्षाची संधी दिली आहे. एका वर्षानंतर नागपूर शहरात असलेल्या टॉवर तयार केलेल्या किती कंपन्यांनी हया सगळया अटीशर्तीचे पालन केले याची माहिती जर या विभागाकडे असेल तर त्यांनी आपल्या माध्यमातून दयावी

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, असे एकही टॉवर नसेल ज्यांनी हे सगळे डाक्युमेंट पुर्ण केले असेल परंतु आपण हमीपत्र देतो.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, एका वर्षानंतर ज्यांनी एकही अटीशर्ती पुर्ण केल्या नाही त्या सगळयांवर कार्यवाही, काय निर्देश, काय आदेश आहेत. मा.उच्च न्यायालय काय म्हणते या बाबत माहिती असेल तर आपल्या माध्यमातून माहिती देण्यात यावी.

महापौर:- माहिती देण्यात यावी.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, अर्जदाराने नियमित करण्याकरिता अर्ज दिल्यानंतर एक वर्षाच्या आत हमीपत्र देवून एक अस्थायी स्वरुपात त्यांना....

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, ती स्पष्टपणे सांगितले एक वर्ष झाल्यानंतर आपण काय कार्यवाही केली. आपल्याकडून काय अपेक्षित आहे याची माहिती दयावी. एका वर्षाच्या आत सगळया फार्मलिटीजी त्या कंपन्याना पुर्ण करावयाच्या होत्या त्या पुर्ण केल्या नाहीत. मा.उच्च न्यायालयाचे काय निर्देश आहेत ती माहिती देण्यात यावी.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, एका वर्षाच्या आत डाक्युमेंटशन पुर्ण केलेले नाही तर त्यांच्यावर त्या संदर्भात झोन ला कळवितो की या मोबाईल टॉवरने कोणतेही डाक्युमेंटशन हे एक वर्षात पुर्ण केलेले नाही. याच्या अगेस्टमध्ये कार्यवाही करण्याचे पॉवर आम्हांला नाही. तशाप्रकारचे डायरेक्शन मा. हायकोर्टाने दिले आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, कार्यवाही करण्याचे अधिकार एडीटीपी विभागाला नाही आहेत तर मग कुणाला अधिकार आहेत.

श्री.हर्षल गेडाम (सहा.संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, या संदर्भात जास्तीत जास्त एमआरटीपी कलम ५३ अंतर्गत नोटीस देवू शकतो त्या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही करु शकत नाही. मा. उच्च न्यायालयाचे त्या अनुषंगाने निर्देश आहेत.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, काय निर्देश आहेत हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. एवढे जर नियम कडक आहेत आणि वर्षभरात आत ते पुर्ण करीत नसेल तर त्या कंपन्यांमुळे आपले रेव्हेन्यु जात आहे. मोबाईल कंपन्यांच्या टॉवरमुळे रेडिएशनचा त्रास होत आहे. अनेक अपघात होण्याची शक्यता आहे. या संदर्भात एडीटीपी विभागाचे अधिकारी दिशाभूल करीत आहेत. या मोबाईल टॉवरच्या संदर्भात वस्त्या वस्त्यांमध्ये आपआपसामध्ये भांडण होत आहे. या मोबाईल टॉवरची आवश्यकता आहे परंतु दुसरीकडे ते लिगल असले पाहिजे. ते रेडिएशन फ्री असले पाहिजे. ते योग्य मार्गदर्शनाखाली पोहचले पाहिजे. नाही तर उद्या समाजामध्ये भांडणे होतील. कारण यावर ५३

ची नोटीस देणे हा काही मार्ग नाही. त्यामुळे मा.महापौरजी आपण कडक शब्दात एडीटीपी विभागाला निर्देश दयावे. याच्यात जे तज्ञ मंडळी असतील त्यांची मदत घेवून एक्झेक्ट काय कार्यवाही करु शकतो हे सगळे महानगरपालिकेने तपासून घ्यावे एवढीच माझी विनंती आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, ब-याच वेळेपासून चर्चा ऐकुन राहिलो. मा.सदस्य श्री. राजकुमार साहू यांनी चर्चा सुरु केली आणि अगदी स्पष्टपणे म्हटले की एक मोबाईल टॉवर हा उभा होवून राहिला आणि त्यांनी तक्रार केली तरी एडीटीपी विभागाने कार्यवाही केली नाही. मा.हायकोर्टाचे आदेश आहेत परंतु याला विथर्ड करु नका असे कुठेही म्हटलेले नाही आहे. संपुर्ण अधिकार एडीटीपीला आहे. जर एखादी तक्रारी आली तर तुम्ही त्याची माहिती घेवून जेथे टॉवर उभा होवून राहिला त्याची चौकशी करणे, त्याने पुर्ण फॉर्मेलिटी पुर्ण केल्या किंवा नाही आणि जोपर्यंत फार्मेलिटी पुर्ण करीत नाही त्यापर्यंत त्या टॉवरला रिजेक्ट करणे हे यांच्या हातात आहे. परंतु जाणूनबुजून टॉवर उभे करण्याचे काम करण्यात येत आहे. गेडाम साहेब आपल्याला सर्व माहीत आहे. ज्या ज्या ठिकाणच्या तक्रारी आल्यात त्या देवून सुध्दा त्या ठिकाणी टॉवर उभे झाले असतील तर संपुर्ण दोषारोपण एडीटीपी विभागावर दयावे आणि त्या प्रकारची कार्यवाही प्रस्तावित करावी. राजकुमार साहू यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यांच्या त्या विषयावर न्याय देण्यात यावा अशी मी या अनुषंगाने विनंती करतो.

श्री.राजकुमार साहू:-मा.महापौरजी, हमारा प्रभाग मे ९० परसंट आऊटर भाग है। विभाग से बताया जा रहा है की टॉवर लगाने के लिए एक वर्ष का हमीपत्र देके परमिशन दी जाती है। हमारे प्रभाग मे ऐसे ऐसे टॉवर है जो १०-१५ साल से लगाये गये है। उस पर कोई भी प्रकार की कार्यवाही हुई नही है। मेरे शिकायत पर विभाग की तरफ से कोई उत्तर नही दिया जाता है। मेरे विषय पर मुझे न्याय देने की कृपा करे मा.महापौरजी, विभाग की तरफ से सदन को गुमराह करने की कोशीश् कर रहे है। इन टॉवर की वजह से आम जनता के स्वास्थ्य की समस्या हो रही है।

महापौर:-मोबाईल टॉवर का विषय अत्यंत गंभीर है, इस विषय पर सखोल चर्चा हुई, सभी सदस्यो ने एकही दिशा मे चर्चा की, और सबका कहना है कि, स्वास्थ्य के लिये मोबाईल टॉवर हानीकारक है, जनस्वास्थ्याशी निगडीत हा प्रश्न असल्यामुळे सगळयांनी गांभिर्याने याची दखल घेतलेली आहे, कोर्टाचे आदेश असले तरी नवीन टॉवरचे बांधकाम सुरु आहे, असा आरोप मा.सदस्य, श्री राजकुमार साहु यांनी केलेला आहे, मी प्रशासनाला निर्देश देतो कि नवीन टॉवरचे बांधकाम सुरु असतांना दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही का करण्यांत आली नाही ? याबद्यल मा.आयुक्तांनी अति.आयुक्तांच्यामार्फत चौकशी करावी, आणि अशी चुक झाली असेल कि मोबाईल टॉवरचे काम सुरु असतांना तक्रार आल्यानंतर सुध्दा कार्यवाही करण्यांत आली नाही तर अश्यावेळी संबंधित अधिका-यावर नियमाप्रमाणे कोणती कार्यवाही करता येवु शकते, त्याप्रमाणे कार्यवाही करावी, सोबतच स्वास्थ ही अत्यंत गंभीर बाब असल्यामुळे मा.न्यायलयानी दिलेला जो आदेश आहे त्या आदेशानंतर ही प्रक्रिया सतत सुरु राहिली तर यामुळे लोकांचे स्वास्थ अडचणीत येईल, त्यामुळे टेलीकम्युनिकेशन विभागाच्या माध्यमातुन तज्ञांची एक समिती बोलावुन रेडीयेशन टेस्टबद्यल जे नमुद करण्यांत आले आहे, या शहराच्या आवश्यकतेनुरुप किती मोबाईल टॉवरची आवश्यकता आहे, आणि या टॉवरमुळे किती रेडीयेशन वाढते आणि जनस्वास्थावर हानी होते, याचे असेसमेंट करुन आवश्यकतेप्रमाणे जास्त रेडीयेशन वाढले असेल तर यादृष्टीने महानगरपालिकेनी एक सुमोटो याचिका दाखल करुन मा.न्यायालयात दाद मागीतली पाहिजे. या शहराच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने महानगरपालिका स्वत: कोर्टात गेली पाहिजे, असे निर्देश

या सभेच्या माध्यमातुन प्रशासनाला देण्यांत येत आहे.

**प्रश्न क्र. २५१:**-नागपूर मनपा सिमे अंतर्गत मनपा शाळेत वर्ग ९ ते १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन शिक्षण घेता यावे याकरिता टॅबलेट उपलब्ध करुन देण्या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त:- वितरीत केल्याप्रमाणे

**ठराव क्र.८६:- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 18.02.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 18.02.2021 सकाळी 11.45 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 18.02.2021 दुपारी 03.20 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. विशेष सभा दिनांक 22.02.2021 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त

महापौर:- मा.निगम सचिवजी से निवेदन है डिव्हीजनल कमिश्नर ऑफीस से हमे पत्र मिला है उसका वाचन करे।

निगम सचिव:- (**वाचले**) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांचे २४ ते २०२१ चे पत्र

आदेश

संदर्भिय अधिनियम, नियम व कागदपत्र/दस्ताऐवजांचे पडताळणीअंती याद्वारे मी डॉ.संजीव कुमार, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर श्री. जितेंद्र घोडेस्वार, प्रभाग क्र. ६ (अ) यांची नागपूर शहर महानगरपालिकेत बहुजन समाज पक्षाचे पक्षनेते/गटनेते म्हणून केलेल्या निवडीस मान्यता प्रदान करीत आहे.

विभागीय आयुक्त,

नागपूर विभाग, नागपूर

महापौर:-जितेंद्र घोडेस्वारजी बहुजन समाज पक्ष के गटनेता डिव्हीजनल कमिश्नर ऑफीसने घोषित किया है उन्हे हार्दिक बधाई देते है ।अगले सभागृह मे बहुजन समाज पक्ष के गटनेता के रुप मे जितेंद्र घोडेस्वारजी उपस्थित रहेंगे। लक्षवेधी प्रवीण दटके इनकी आई है कृपया निगम सचिवने इसका वाचन करे।

निगम सचिव:- **लक्षवेधी** (वाचले)

मा.सदस्य,श्री.प्रविण दटके यांनी माध्यमिक शिक्षण विभाग मनपा तर्फे सन २०१२ पासुन ते आजपर्यत निवृत्ती वेतन अनुदानाची रक्कम शासनाकडुन जिल्हापरिषद व्दारा न मागविता मनपा तिजोरीवर जवळपास ८.५० करोड रुपये भुर्दंड बसविणा-या व आपल्या कर्तव्यात कसूर करणा-या शिक्षणाधिकारी (माध्य) मनपा यांच्यावर कारवाई करण्याबाबत सादर केलेली लक्षवेधी.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, मला माहिती अधिकारात काही कागदपत्रे प्राप्त झाली आहे. हया कागदपत्राच्या अनुषंगाने २०१२ पासून निवृत्तवेतनाच्या रक्कमेची मागणी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने केलेली नाही अशी

माहिती मला माहिती अधिकारामध्ये प्राप्त झाली आहे. त्याच बरोबर याच्यामुळे जवळपास ९ कोटीचा भुर्दंड बसलेला आहे. २०१२ ते आजपर्यंत शासनाने पुर्ण निवृत्तीवेतन दिलेले आहे. याची आजपर्यंत याची मागणी कां केलेली नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, दटके साहेबांनी त्यांची लक्षवेधीवरील सुचना या ठिकाणी मांडली. आपल्या कामकाजाच्या नियमावलीप्रमाणे लक्षवेधीच्या सुचनेवर चर्चा करता येत नाही. प्रशासनाला आपले निवेदन या ठिकाणी द्यावयाचे आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

शिक्षणाधिकारी(श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन, नागपूर महानगरपालिकेमध्ये ११७ मान्यताप्राप्त शाळा आहेत. २०१२ ते २०१८ पर्यंत महानगरपालिकेला शालेय वेतन.....

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, यांचा आवाज ऐकु येत नाही. या विभागाचे जे उपायुक्त आहेत त्यांनी निवेदन करावे अशी माझी विनंती करतो. आपल्या कामकाज नियमावलीप्रमाणे सभागृह चालू आहे. या विभागाचे जे संबंधित उपायुक्त आहेत त्यांनी यावर निवेदन करावे.

महापौर:- कमिश्नर साहेबांना निवेदन करतो की तत्सम जे सक्षम अधिकारी असतील त्यांनी त्याच्यावर उत्तर दयावे.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, कामकाज नियमावलीप्रमाणे जर मला चर्चा करता येत नसेल तर नियमाप्रमाणे जे अधिकारी आहेत त्यांनाच उत्तर दयावे लागेल.

महापौर:- या विभागाला उपायुक्त नाही. कृपया अतिरिक्त आयुक्त यांनी उत्तर दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, सार्वजनिक निकडीच्या विषयावर लक्षवेधी जर दिली असेल तर मा.आयुक्तांना निवेदन करता येईल किंवा नंतरच्या तारखेवर निवेदन करण्यासाठी वेळ मागून घेता येईल. त्यामुळे यावर स्वत: आदेशित करावे. मा.आयुक्तांकडे जर ती माहिती उपलब्ध नसेल तर मा. आयुक्त पुढच्या सभेमध्ये ती माहिती देवू शकतात.

महापौर:- निगम आयुक्त महोदयांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त:-सन्माननीय महापौरजी, माहिती सध्या माझ्याकडे नाही आहे. पुढच्या सभागृहामध्ये या संदर्भातील सविस्तर माहिती देवू इच्छितो.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, काही हरकत नाही. मा. आयुक्त पुढच्या सभागृहात निवेदन करीत असतांना या विषयासोबत माझ्याकडे उपायुक्त गार्डन विभाग यांचे पत्र आहे त्या अधिका-याला सस्पेंड करतो, सस्पेंड करतो म्हणून म्हटले जाते परंतु केले जात नाही. या पत्राच्या अनुषंगाने संबंधित अधिका-याला बोलावून त्याची विचारणा केली पाहिजे.

महापौर:- हा विषय येथे संपुष्टात येते. प्रवीण दटके यांच्या विषयावर पुढच्या सभागृहात उत्तर मिळणार आहे.

प्रवीणजीने जी सुचना केली ती मी ऐकली आहे त्याच्यावर दखल मी घेणार आहे.या ठिकाणी स्थगण प्रस्ताव विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे यांच्याकडून आला आहे. कृपया स्थगण प्रस्तावाचे वाचन निगम सचिवांनी करावे.

निगम सचिव:- **स्थगण प्रस्ताव** (वाचले)

मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी नागपूर शहरात महानगरपालिकेकडून कचरा संकलनाकरीता देण्यात आलेल्या एव्हीजी व बीव्हीजी कंपनीच्या कामात होत असलेल्या अनियमितमूळे नागपूर शहरातील नागरिकांना होणा-या त्रासाच्या संदर्भात चर्चा घडवुन आणण्यासाठी सादर केलेला स्थगन प्रस्ताव

श्री. तानाजी वनवे:- महापौरजी, नागपूर शहरामध्ये कोव्हीडच्या काळामध्ये बीव्हीजी आणि एव्हीजी या कंपनीची जी मनमानी सुरु आहे. प्रत्येक वार्डामध्ये, प्रत्येक एरियामध्ये या दोन महिन्यामध्ये गाडया रेग्युलर गेलेल्या नाहीत. एका एरियामध्ये, एका गल्लीमध्ये दोन-दोन, तीन-तीन दिवस गाडया गेल्या नाहीत. काही ठिकाणी तर आठ-आठ दिवस कचरा उचलायला गाडया गेल्या नाहीत. या कंपन्यांनी आपल्या गाडयांचे पेट्रोल, डिझेल वाचविण्याचे काम केले आहे. यांच्या गाडयामध्ये कच-यासोबत गाळ, माती  मिसळलेली दिसत आहे. ज्या ठिकाणी वजन काटा केला जातो त्या ठिकाणी मिस्टर राठोड की कुणी तरी आहेत माहीत नाही. त्या ठिकाणी साठंगाठ करुन कच-याचे वजन वाढविण्याचे काम सुरु आहे. आणि प्रशासनातील आयुक्त माझा स्पष्ट आरोप आहे त्यांचे या गोष्टीला समर्थन आहे. आयुक्तांचे त्या कंपनीच्या मालकाशी काही सांठगाठ तर नाही ना असे वातावरण निर्माण होत आहे.  अनेक लोक या महामारीत उपासमारीने मरत आहे. या दोन्ही कंपन्यांची ताबडतोब चौकशी करण्यात यावी. तसेच संबंधित जो कुणी अधिकारी असेल त्यांची सुध्दा चौकशी करण्यात यावी. या दोन्ही कंपन्यांकडून कोव्हीडच्या  काळात कचरा उचलला गेला नाही. लॉकडाऊन असल्यामुळे या कंपन्यांच्या गाडया प्रत्येक एरियामध्ये पोहचून कचरा उचललेला नाही.  तसेच कच-यामध्ये माती मिसळल्या जात होती अशा अनेक तक्रारी आयुक्तांकडे केल्या गेल्या तरी नियमाप्रमाणे आयुक्तांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांनी स्थगण प्रस्ताव आणला आहे आणि या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. तानाजी वनवे यांनी थेट आयुक्तांवर आरोप केले आहे आणि या आयुक्तांची चौकशीची मागणी केली आहे. मा.महापौरजी, आपल्याला अशी चौकशी करण्याचा अधिकार दिलेला आहे काय? की राज्य शासनाला दिलेला आहे हा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होतो. त्या संदर्भात  प्रशासनाने माहिती दयावी.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर, या कंपनीची चौकशी करण्याचा अधिकार प्रशासनाचा आहे. प्रशासनाने त्याची चौकशी करावी. मी आयुक्तांना त्यावेळी पर्सनली भेटलो आणि या संदर्भात सांगितले की या कंपन्यामध्ये गरीब लोक जे कंपनीत कामावर लागलेले आहेत त्यांना काढल्या जात आहे. आपण दरवर्षी या कंपन्यांना किती पैसे देतो, किती डिझेल, पेट्रोल देतो, किती गाडया देतो, किती गाडया कचरा संकलनासाठी जातात याचा वार्षिक अहवाल स्थायी समितीपुढे दयावयाचा होता. या कंपन्यांना जो पैसा देतो तो नागरिकांच्या टॅक्सच्या माध्यमातून आलेल्या पैश्यातून देतो मात्र बीव्हीजी आणि एगी कंपन्यांनी गरीब लोकांकडून पैसे घेवून त्यांना पंधरा दिवस कामावर ठेवून घेतले आणि नंतर कामावरुन कमी करुन घेतले. त्यांच्याकडून पैसे घेवून दुस-या लोकांना कामावर लावण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या आहे. त्यामुळे अनेक गरीब लोक बेरोजगार झाले आहे. या कोव्हीडच्या

काळामध्ये या कंपन्यांनी कचरा संकलन सुध्दा बरोबर केले नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फॉमेशन, मा. महापौरजी, माझा मुद्दा असा आहे. या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून तानाजी वनवे यांनी आयुक्तांवर थेट आरोप केला आहे की याच्या मध्ये आयुक्त इन्व्हॉल आहेत. आपण आयुक्तांना आदेश देतो की आयुक्तांनी या संदर्भातील चौकशी करावी. परंतु विरोधी पक्ष नेत्यांनी आयुक्तांवरच अविश्वास व्यक्त केला असेल तर चौकशी कुणाच्या माध्यमातून करायची. त्यामुळे याच्यामध्ये प्रशासनाने त्या संदर्भातील उत्तर दयावे.

श्री.तानाजी वनवे:- सभागृहाने तशी समिती नियुक्त करावी.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, माझा तोच प्रश्न आहे सभागृहाला आयुक्तांची चौकशी करण्याचा अधिकार आहे काय ?

श्री.तानाजी वनवे:- आयुक्तांची चौकशी करण्यासंदर्भात शासनाकडे पत्र पाठवा.आयुक्तांनी त्यांची बाजू घेतली आहे. इतके सगळे होत असतांना आयुक्त झोपले होते काय ? सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे.

महापौर:- नेमके आपले काय म्हणणे आहे तानाजी वनवे, आपण ते थोडक्यात सांगावे.

श्री.तानाजी वनवे:-ज्या लोकांना नोकरीवरुन काढले आहे त्या लोकांना घेतले पाहिजे. कच-यामध्ये माती मिक्स करण्यात येते, वजनकाटयावर जो कुणी आहे त्याची ताबडतोब बदली झाली पाहिजे.

महापौर:- तानाजी आपले काय म्हणणे आहे ते सांगावे.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, तानाजी यांचे नेमके काय म्हणणे आहे. आयुक्तांची चौकशी करावयाची आहे की त्या कंपनीची चौकशी करावयाची आहे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, कंपनीची चौकशी करायचीच आहे. जे अवैधरित्या पैसे घेवून त्या कंपनीत लागले त्या लोकांची चौकशी करावयाची आहे. या संदर्भात आयुक्तांना अनेक वेळा बोललो परंतु आयुक्त या विषयाला गंभीरतेने घेत नाही. आयुक्तांचे कंट्रोल त्या कंपनीवर नाही आहे.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, तानाजी वनवे यांचे वक्तव्य होते की आयुक्त आणि त्या कंपनीची सांठगाठ आहे. आणि हे वक्तव्य जर तानाजी वनवे चे असेल तर चौकशी कुणाची करायची.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, सांठगाठ आहे म्हणूनच ते बोलत नाही आहे. जर आयुक्तांची सांठगाठ नाही तर कुणाची आहे. सर्व नगरसेवकांच्या या कंपनीच्या संबंधित तक्रारी आहेत. कंपनी आम्ही आणलेली नाही. आपण त्यांना कंत्राट दिलेला आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- आपण थोडी आणली आहे टेंडर करुन आणलेली आहे.

महापौर:- स्थगण प्रस्ताव के माध्यम से तानाजी वनसे इन्होने यह विषय यहां पर रखा।

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, कोव्हीड संक्रमणाच्या काळामध्ये एक वर्षापासून बीव्हीजी आणि एजी कंपनीचा घोळ चालू आहे. माझ्याकडे याचा व्हिडीओ सुध्दा आहे जर आपल्याला दिसत असेल तर मी मोबाईल वर दाखवित आहे. ते कच-यामध्ये माती मिसळीत आहे. या कंपन्यांना नागपूर शहराच्या जनतेकडून प्राप्त झालेल्या पैश्यातून आपण भुगतान करतो. माझ्या प्रभागातील महेंद्रनगर सेंटरचा हा व्हिडिओ आहे.

महापौर:- मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार आपल्याकडे जी व्हिडिओ आहे ती लेखी तक्रारीसह आयुक्तांकडे दयावी. महानगरपालिकेची स्थापित यंत्रणा आहे त्या यंत्रणेप्रमाणे आपण जो व्हिडिओ दाखवीत आहे. त्यात गाडी नंबर असेलच, जीपीआरएसप्रमाणे त्या दिवशी गाडी कुठे होती. गाडीचा मुव्हमेंट काय होता याचा सखोल चौकशी करुन आयुक्त कठोर दंडात्मक कार्यवाही करतील असे आयुक्तांना निर्देश देण्यात येत आहे. आपण लेखी तक्रारीसह तो व्हिडिओ दयावा. विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे वक्तव्य करीत असतांना त्यांचे दोन विषय आहेत. एक विषय आहे कच-यामध्ये माती मिसळवीत आहेत आणि दुसरा विषय आहे दोन्ही कंपन्यांनी नोकरीतून लोकांना काढलेले आहे. नोकरीवरुन लोकांना काढलेला आहे हा जो काही विषय आहे त्या विषयामध्ये दोनदा, एक तक्रारी पूर्वी अशी होती. लागोपाठ एक माणुस अशी तक्रार करीत होता. त्याचे लोक नोकरीवर लागले तर त्याची तक्रार बंद झाली. अशा प्रकारची मागणी तर नसायला पाहिजे. कारण या प्रकारची पध्दत शहरात सुरु झाली आहे. आपली नेमकी तक्रार जर कच-याबद्दल असेल तर जसा आता माझ्यासमोर मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार यांनी व्हिडिओ दाखविण्याचा प्रयत्न केला आणि मी सांगितले त्याच्यावर शंभर टक्के कार्यवाही होईल आपण गाडी नंबरसह त्या ठिकाणची तक्रार दयावी. आपला सिस्टम एवढा स्ट्रांग आहे की आपण कोणत्याही माणसाला न सांगता सिस्टीमच्या माध्यमातून कार्यवाही करु शकतो. तशा प्रकारची आपण तक्रार दयावी आपण त्या तक्रारीवर शंभर टक्के कार्यवाही करु. उरली बाब, कर्मचा-यांना कामावर ठेवण्याची तर या विषयावर प्रशासनाची काय भुमिका आहे ती प्रशासनाने स्पष्ट करावे.

अपर आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी या विषयाच्या संदर्भात जे मुद्दे उपस्थित केले. एकतर त्यांचा आवाज बरोबर येत नव्हता. प्रशासनाच्या वतीने मी सांगू इच्छितो की  परंतु त्यांना काय म्हणावयाचे होते ते निश्चितपणे कळत नव्हते. सरतेशेवटी त्यांच्या सुचनेनुसार असे कळले की माणसे लावली नाही असे त्यांचे म्हणणे होते. यावर प्रशासनाचे स्पष्ट मत आहे.

निगम आयुक्त:-महानगरपालिकेचा एग्रीमेंट एगी आणि बिव्हीजी कंपनीसोबत आहे. करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार त्यामध्ये स्पष्ट आहे की माणसे लावणे ही जबाबदारीकंपनीची आहे, किती माणसाकडून काम करायचे त्याचा एमएलपी त्या अनुषंगाने घ्यावयाची माणसे आणि त्या माणसांवर नियंत्रण ठेवणे ही कंपनीची जबाबदारी आहे. यात नागपूर महानगरपालिका ही मालक आहे. प्रिन्सीपल इम्प्लॉयर हा तो मालक राहणार आहे. ही नागपूर महानगरपालिकेची जबाबदारी राहणार नाही.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर, या सभागृहात आपल्याला धन्यवाद देतो आपण या टेंडरचा एग्रीमेंट या सभागृहाच्या पटलावर ठेवले होते. मुल्यवान सुचना आपल्या सहीत सर्वांना त्या एग्रीमेंटच्या संदर्भात सर्व नगरसेवकांनी या सभागृहात दिल्या होत्या. एकही सुचना त्या एग्रीमेंटमध्ये सामील केल्या नाही. दुसरे आपण काही महिन्यापूर्वी आपल्याकडे एक बैठक बोलाविली होती. मा. तानाजी वनवे  विरोधी पक्ष नेत्यांनी ही तक्रार केली आहे की काही लोकांना घेवून काही लोकांना कामावरुन बंद केले आहे. बिव्हीजी कंपनीने १३० कर्मचा-यांपैकी ३०-४० लोकांना कामावर घेतले, उरलेल्या लोकांना वा-यावर सोडले. झोन क्र. १ ते ५ मध्ये जी एगी कंपनी काम करते. एगी कंपनीची

आपण बैठक घेतली, प्रशासनाला निर्देश दिले. प्रशासनाने काय केले, आपण त्याचा गोषवारा काढला होता. परंतु प्रशासन इतके विचित्र आहे. आपल्या बैठकीच्या मिनिटस् मधून ज्या गोष्टी होत्या त्या गोष्टी प्रशासनाने गायब केल्या आणि म्हणून तानाजी वनवे यांनी आयुक्तांवर आरोप केले की आयुक्तांची सांठगाठ आहे काय? प्रत्येक झोनमध्ये किती गाडया आल्या पाहिजेत, किती वाजेपर्यंत आल्या पाहिजेत, कचरा संकलन कशा पध्दतीने करण्यात यावे, किती तासात गाडया गेल्या पाहिजेत, किती वाजेपर्यंत गाडया चालल्या पाहिजे, गाडया गेल्या नाही तर किती दंड लागला पाहिजे. हे सगळे त्या बैठकीत आपण तीन-चार तास मुल्यवान वेळ देवून बैठका घेतल्या होत्या. त्या त्या झोनचे बैठकीचे मिनीटस् आम्ही प्राप्त केले, त्या गोष्टीला कुठेतरी प्रशासनाने गायब केले. म्हणून आयुक्तासहीत प्रशासनावर आक्षेप झालेत. माझी आपल्याला विनंती आहे , आपण जी बैठक घेतली त्या बैठकीचे मिनीटस् कृपया तपासण्यात यावे. आणि आपण प्रत्येक झोनमध्ये जो दंड म्हटला होता तो कितीतरी करोडमध्ये होता त्याचे काय झाले. त्या एग्रीमेंटप्रमाणे आपण लावतो आहे काय? महानगरपालिका त्या एग्रीमेंटप्रमाणे वागत आहे काय? तो एग्रीमेंट सभागृहाच्या पटलावर ठेवत असतांना मा.सदस्यांनी सुचना केल्या होत्या त्या सुचना त्या एग्रीमेंटमध्ये कोलॅबरेट केल्या काय? त्या सगळया तपासल्या पाहिजे मा.महापौरजी. म्हणून माझी विनंती आहे आपण या सगळया प्रस्तावावर योग्य ती चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. यामध्ये स्वच्छ, सुंदर नागपूर शहर अशी ख्याती होती आणि इंदोर महानगरपालिकेने नागपूर शहर हे किती स्वच्छ आणि सुंदर आहे हे बघून आपले शहर स्वच्छ आणि सुंदर केले. या नागपूर शहराचे हाल बेहाल या दोन कंपन्या करीत आहे.अशा चुकीच्या पध्दतीने या कंपन्या काम करीत आहे आणि असे घडले आहे म्हणून शंका निर्माण होत आहे. मा.महापौरजी या प्रकरणांत आपण विशेष लक्ष दिले पाहिजे. मी तर म्हणतो की आपल्या अध्यक्षतेखाली मा.सत्तापक्ष नेते, मा. विरोधी पक्ष नेता आणि आपण आणि गरज पडली तर वैद्यकीय समितीचे अध्यक्ष आणि अति.आयुक्त अशा पाच जणांनी मिळून या दोन्ही कंपनीच्या टेंडरची चौकशी केली पाहिजे. चौकशीअंती काही गडबड असेल तर माझी सभागृहाच्या आणि आपल्या माध्यमातून मागणी आहे. हे दोन्ही टेंडर रद्द केले पाहिजे. नवीन झोन टेंडर या नागपूर शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी केले पाहिजे अशी या प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी आहे.

महापौर:- सन्माननीय सदस्यांनी जी बाब समोर आणली. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या टेंडरमध्ये या बाबींचा उल्लेख होता. त्या बाबींप्रमाणे दोन्ही कंपनी काम करीत आहे किंवा नाही याची चौकशी करण्यासाठी जे संबंधित स्वास्थ्य विभागाचे अति.आयुक्त आहेत ते आणि स्वास्थ्य समितीचे जे अध्यक्ष आहेत या दोघांनी मिळून त्याची चौकशी करावी.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, माझी विनंती आहे. या समितीमध्ये सिनीअर सदस्य असले पाहिजे त्यामुळे दबाव पडतो मा.महापौरजी म्हणून माझी मागणी आहे.

महापौर:- मा.सदस्य श्री.प्रवीण दटके यांच्या मागणीनुसार या दोन्ही कंपनीच्या कामाबद्दल एक समिती नेमण्याचा अधिकार मला दिलेला आहे. त्या अधिकाराअंतर्गत मी पाच लोकांचे नाव घोषित करेल. त्याप्रमाणे यात अधिकारी आणि जनप्रतिनिधी या दोघांची मिळून एक समिती राहील. या दोन्ही कंपनीच्या कामाबद्दल चर्चा करुन त्याचा निष्पन्न काढून त्यांच्या कामात त्रुटी आढळली तर नियमाप्रमाणे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होत आहे किंवा नाही. हे पुर्ण काम कायदेशिर असेल तर ठीक आहे. बेकायदेशिर काम करीत असेल तर त्या दृष्टीने पुढील जी काही कार्यवाही महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

**<u>ठराव क्र.८७/वि.क्र.४८</u>** :-प्रभागक्रमांक ३३ अंतर्गतविलासनगरयेथीलमुख्यरस्त्याचेसिमेंटक्रॉक्रीट{**लोककर्म झोन क्र. ४**} रस्त्याचेकामकरणे.

मा. जिल्हाधिकारीयांचेपत्रक्रमांकडेक्स – १२ एमयुएन-३ /कावि-९६९/प्र.मा-१४८/१४८/२०१९, जिल्हाधिकारी, नागपूरयांचेदिनांक ०९-०८-२०१९ अन्वयेरु. १,६४,९०,१११/- चेप्रशासकीयमान्यताप्राप्तआहे. याकामाकरीतामहाराष्ट्रशासनाचे ५० टक्केअनुदान(रु ८२,४५,०५६/-) वमहानगरपालिकेकडून ५० टक्केहिस्सा(रु ८२,८५,०५६) असेअसुनएकुणरु १,६४,९०,१११/- आहे. महानगरपालिकेच्या ५० टक्केहिस्सापदक्रमांक A४२००१३६०९०५ अंतर्गतखर्चकरण्याकरीतामनपासहभागासंबंधिचाविषयमा. सभागृहाव्दारेमंजुरीस्तवसादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.८८/वि.क्र.४९</u>** :- प्रारूप नगर रचना परियोजना पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी **{नगर रचना विभाग}** टिपीएस–1 नागपूरप्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(5) अन्वये मंजूरी करीता लवादामार्फत शासनास सादर करण्यापूर्वी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे लवादाने सुचविलेल्या बाबींवर अभिमत.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी येथे नगर रचना परियोजना (Town Planning Scheme) राबविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप नगर रचना परियोजनेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 68(2) अन्वये राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याबाबतची अधिसूचना दि. 24.10.2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसध्दि करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेतील तरतूदीनूसार विकास आराखडयातील जमिन वापरात बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली असून त्याबाबतची अधिसूचना भाग 1–अ (असा) (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. 159, दि. 22.11. 2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72 अन्वये राज्य शासनाने सहाय्यक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती केली आहे व त्याबाबतची अधिसूचना क्र. भाग 1–अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा.रा. अ.क्र. 218, दि. 16.11.2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

लवाद यांनी महाराष्ट्र नगर रचना योजना नियम 1974 चे नियम क्र. 13 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. 28.12.2012 रोजी आणि स्थानिक वृत्तपत्र दै. लोकमत व इंग्रजी दै. द हितवाद मध्ये दि. 29.12.2018 रोजी सूचना प्रसिध्द करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 102 अन्वये सदर्हु नगर रचना परियोजना तयार करण्यात आल्यामुळे त्यामध्ये अपायकारकरीत्या बाधीत झालेल्या व या परियोजनेमध्ये समाविष्ट झालेलया जागांमध्ये हित संबंधि असलेल्या व्यक्तींकडून विहीत 60 दिवसाचे मुदतीत / आक्षेप/हरकती मागविण्यात आल्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(4) आणि महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम 13(3) नूसार, फार्म–1 मध्ये नमूद संबंधित जमिन मालक यांना विशेष नोटीस बजावून प्रारूप नगर रचना परियोजनेचे त्यांचे जागेतील प्रस्तावाबाबत स्थळपाहणी करून माहिती देण्याची व त्यांची तसेच आक्षेप धारकांची सूनावणी घेण्याची कार्यवाही दि. 30.09.2019 पावेतो पुर्ण करण्यात आलेली आहे.

उक्त प्रारूप नगर रचना परियोजनेतील अहवालातील फार्म–1 मधील नोंदीनूसार एकुण 6568 भुखंडधारकांचे नावाची नोंद असून, उक्त धारकांना उपरोक्त नमूद प्रमाणे कलम 72(4) अंतर्गत विशेष नोटीस बजावली असता, सूचनावणीस्तव एकुण 543 जमिनधारक/ भुखंडधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित झालेले असून त्यापैकी काही जमिनधारकांचे / भुखंडधारकांचे एकापेक्षा अधिक सि.स.क्र. चे जागेमध्ये मालकीहक्क आहेत. तसेच कलम 102 अंतर्गत एकुण 717 आक्षेप प्राप्त झालेले असून त्यापैकी सूनावणीस्तव 641 आक्षेपधारक उपस्थित राहिलेले असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. आणि संबंधित जमिन मालक तसेच आक्षेप धारक यांचे कडून सूनावणीमध्ये मांडण्यात आलेले मुद्दे करण्यात आलेल्या मागण्या आणि त्याअनुषंगाने प्रारूप नगर रचना परियोजनेमधील नियोजन विचारात घेवून कलम 72(4) मधील तरतूदीनूसार प्राथमिक परियोजनेचा (Preliminary Scheme) प्रकरणनिहाय अहवाल लवादाने तयार केला आहे.

प्रस्तावित प्रारूप नगर रचना परियोजनेतील 1730 एकर जागेकरीता नागपूर सुधार प्रनयास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस–2419/1419/सी.आर. 154–2019/नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

प्रस्तावित प्रारूप नगर रचना परियोजनेतील 1730 एकर जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस–2419–1419–सि.आर. –154–2019–नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर

महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस– 2419–1419–सी.आर. 154–2019–नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका यांची नियुक्ती झालेली आहे. उक्त प्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(5) अन्वये मंजूरीकरीता शासनास सादर करणेपूर्वी या परियोजनेचा प्रकरणनिहाय अहवाल तयार करतांना काही खालील प्रमाणे नमूद ठळक बाबीवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(7) (बी) मधील तरतूदीनूसार नियोजन प्राधिकरणास सूनावणी देण्याकरीता लवाद यांनी पत्र क्र. नरयो क्र. 1/नाग/कलम 72(7)(बी)/ लवाद 988, दि. 07.12.2019 अन्वये नोटीस बजावून नागपूर महानगरपालिकेच्या वतीने मा. आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने दि. 18.12.2019 रोजी उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे. सदर पत्र नस्तीत टांचण करण्यात आले आहे, कृपया अवलोकन व्हावे. मा. आयुक्त यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL, Nagpur यांना सदर सूनावणीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश दिले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी हे कार्यालयीन कामाकरीता दिल्ली येथे उपस्थित असल्याकारणाने सदर सूनावणी दि. 21. 12.2019 रोजी पार पडली. या सूनावणी दरम्यान लवादाने प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर चर्चा करण्यात आली. तसेच मा. मुख्य कार्यवाही अधिकारी, NSSCDCL, Nagpur यांनी सदर प्रकरणी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे अभिमत घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. सदर सूनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनूसार लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर मुख्य कार्यवाही अधिकारी यांचे अभिप्राय पत्र क्र. 2113/ NSSCDCL/2019, Dt. 21/12/2019 नूसार लवाद यांना कळविण्यांत आले.

सूनावणीमध्ये नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात येत असलेल्या अहवालातील प्रकरण निहाय नमूद बाबींवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत प्राप्त होणे आवश्यक आहे. शिवाय कलम 72(4) अन्वये पार पाडलेल्या सूनावणीमधील संबंधित जमिन मालक/आक्षेप धारकांकडून उपस्थित करण्यात आलेल्या सर्वसाधारण बाबींवर आणि लवादांचे निदर्शनास आलेल्या बाबींवर सुध्दा नियोजन प्राधिकरण असलेल्या नागपूर महानगरपालिकेचे स्पष्ट मत / निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य कार्यवाही अधिकारी यांचे लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवरच्या अभिप्रायावर नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचा अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूर करणेचा विषय विचारात घेणे, आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूरीस्तव व पुढील आदेशार्थ सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून स्मार्ट सिटीशी निगडीत विषय आहे आणि या विषयावर ज्याप्रमाणे आपण कार्यवाही करीत आहे त्या दृष्टीने आलेले जे आक्षेप आहे त्या आक्षेपचा

निर्धार करण्याच्या दृष्टीने आरबिट्रेटर नियुक्त करण्यात आलेला आहे. आणि आरबिट्रेटर जे अहवाल सादर केलेला आहे तो या सभागृहासमोर मंजूर करण्यासाठी हा विषय आलेला आहे. मी प्रशासनाला निर्देश देतो की संबंधित आरबिट्रेटरने जे निर्णय दिले आहे त्या विषयाची संपुर्ण प्रत प्रत्येक नगरसेवकांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी. याबाबतचे निर्देश मा. सभागृहापुढे दि. 20.01.2021 रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशान्वये कार्यवाही पत्र क्र. मनपा/नरवि/2523, दि. 10.02.2021 रोजी करण्यात आलेली आहे. मा. सभागृहाने कार्यवाही पुर्ण करून प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवरच्या अभिप्रायावर नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या अभिप्राय पुनश्चः मा. सभागृहापुढे मंजूर करणेचा विषय विचारात घेणे, आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील अभिप्राय मा. सभागृहापुढे पुनश्चः मंजूरीस्तव व पुढील आदेशार्थ सादरप्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रदीप पोहोणे:- मा.महापौरजी, माझी सुचना आहे, माझी सुचना मी लिखीत दिली आहे.

महापौर:- निगम सचिवांनी यांच्या सुचनेचे वाचन करावे.

निगम सचिव:- (वाचले)

श्री. दिपक वाडीभस्मे:- मा.महापौरजी, स्मार्ट सिटीमध्ये ऑरबिट्रेटरने नागरिकांचे अर्ज स्विकारले होते. अनेक नागरिकांनी विनंती केली होती. अनेक रस्ते दाट वस्तीतून जात असल्यामुळे त्या परिसरातील काही रस्ते वगळण्यात यावे अशी विनंती केली होती. छोटे छोटे प्लॉट आहेत त्या ठिकाणी गार्डनचे आरक्षण टाकले आहे. हाऊसिंगचे आरक्षण टाकले आहे ते वगळले तर लोकांचे पाच हजार फुटामध्ये घरे होवू शकतात. ही अट ऑरबिट्रेटरच्या माध्यमातून टाकण्यात यावी असे सांगितले असतांनाही त्यांना कुठल्याही प्रकारचे उत्तर न देता तश्याचे तसे शासनाला पाठविले. मी माहिती घेतली असता जे रस्ते नागरिकांनी वगळण्याकरिता विनंती केली होती ते रस्ते कुठेही वगळण्यात आले नाही.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझी एक विनंती अशी आहे. आपला स्मार्ट सिटी प्रकल्प आहे. त्या स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये आता जी कोव्हीडची परिस्थिती निर्माण झाली म्हणून त्या परिसरामध्ये ५-६ एकर जागेमध्ये एक दवाखाना प्रस्तावित करावा अशा प्रकारची माझी मागणी आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आपण सुनावणी घेतली होती आणि आपण प्रशासनाला निर्देश दिले होते. ऑरबिट्रेटरने त्या सर्व नागरिकांचे जे आक्षेप होते त्याची सुनावणी घेतली होती त्याचा अभिप्राय त्यांनी स्वतंत्र दिला होता त्याची प्रत सर्व नगरसेवकांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था प्रशासनाने केली नाही. त्याची प्रत नगरसेवकांपर्यंत गेलेली नाही.

महापौर:- मा. प्रफुल्ल गुडधे माझ्या माहितीप्रमाणे सर्व नगरसेवकांपर्यत प्रत गेलेली आहे. तरी प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.हर्षल गेडाम(उप संचालक, नगररचना):- मा.महापौरजी, संपुर्ण नगरसेवकांना प्रत पाठविण्यात आलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, या विषयामध्ये पोहाणेजी यांनी जी सुचना केली आहे त्याला मान्यता प्रदान करावी.

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, आपके माध्यम से कहना चाहता हूँ, जो क्षेत्र मे स्मार्ट सिटी का काम चालू है, वहा पर छत्तीसगढ समाज के लोग रहते है। वहा पर एक भी सामाजिक भवन नही है, वहा पर एक भी सामाजिक भवन का प्रावधान नही है। वहा पर छत्तीसगढ समाज के लोग रहने के वजह से वहां पर सामाजिक भवन की आवश्यकता है मैने पत्र भी दिया था। पर वहां पर कोई स्थान नही दिया गया। मेरी विनंती है वहा पर समाज भवन को प्रावधान दिया जाये।

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, यह जो विषय है सदन के पटल पर रखा है। इस को निश्चित रुप से सपोर्ट करना चाहिए। मा. प्रदीप पोहाणे की जी सुचनाये है वह निश्चित रुप से मंजूर करना चाहिए। परंतु एक विषय मे मै एक प्रश्न प्रशासन से पुछना चाहती हूँ। जो विधायक महोदय है आदरणीयजी कृष्णाजी खोपडे उन्होने घोषणा की है की स्मार्ट सिटी मे हॉस्पीटल यह आनेवाला है। मा.महापौरजी, मै यह पुछना चाहती हूँ की क्या स्मार्ट सिटी का डीपी प्लॉन मंजूर हुआ है क्या? इस विषय की जानकारी मुझे दी जाये।

श्री. दिपक वाडीभस्मे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा.आमदार महोदयने स्मार्ट सिटी मे हास्पीटल के लिए है साडे पाच एकर मे वह आनी चाहिए इसके लिए उन्होने घोषणा भी की है। बडे बडे हॉस्पीटल की स्मार्ट सिटी मे यहा पर आने के लिए मांग की गई थी तब उन्होने अपनी इच्छा भी बताई उस माध्यम से इस शहर मे स्मार्ट सिटी मे साडे पाच एकर जगह हॉस्पीटल के लिए आरक्षित की गई।

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, लीलावती हास्पीटल स्मार्ट सिटी मे आने चाहिए इसका मै विरोध नही कर रही हूँ। स्मार्ट सिटी मे बडे बडे हॉस्पीटल आने चाहिए परंतु जो जगह आरक्षित की जा रही है कुछ हॉस्पीटल के लिए, कुछ लायब्ररी के लिए आरक्षित की जा रही है मै यह पुछना चाह रही हूँ की क्या स्मार्ट सिटी का डीपी प्लॉन मंजूर हो गया है क्या?

महापौर:-प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. मोरोणे(उपायुक्त, स्मार्ट सिटी):-मा.महापौरजी, पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी या चार मौज्यामध्ये १७३० एकर जागेची टाऊन प्लॉनिंग स्किम २०१८ मध्ये राज्य सरकारकडे मंजूर करण्यात आली होती.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी,मी डीपी प्लान विचारीत आहे.

श्री. मोरोणे(उपायुक्त, स्मार्ट सिटी):-मा.महापौरजी, स्मार्ट सिटीचा वेगळा डीपी प्लॉन नाही. स्मार्ट सिटीमध्ये जी १७३० एकर मध्ये जी टाऊन प्लॉन स्किम जाहीर करण्यात आली होती. ती स्कीम नगर विकास विभागाच्या राज्य सरकारमार्फत मंजूर करण्यात आली आहे.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, म्हणजे जे आरक्षण हॉस्पीटल करिता, लायब्ररीकरिता शाळेकरिता आरक्षित आहे ते मंजूर केले आहे.

श्री. मोरोणे(उपायुक्त, स्मार्ट सिटी):-मा.महापौरजी, टाऊन प्लॉनिंग स्कीममध्ये तीन स्टेज असतात. पहिला ड्राप टाऊन प्लॉनिंग जो ऑलरेडी २०१८ मध्ये मंजूर झाला आहे. याच्या नंतरही राज्य सरकारकडे टाऊन प्लॉनिंग स्कीम मंजूरीकरिता पाठविण्यात आलेली आहे. ती मंजूर झाल्यानंतर पुन्हा फायनल टाऊन प्लॉनिंग स्कीम सुध्दा मंजूर करण्यात येईल. पहिल्या स्टेजमध्ये जेव्हा ड्राप टाऊन प्लॉनिंग स्कीम मंजूर होते त्यावेळी त्या योजनेत असलेले रस्ते आणि युटीलिटी यासाठी जी जागा लागते ती त्या ड्राप टाऊन प्लॉन मंजूर झाल्या नंतर बाय डिफॉल्ट प्लॉनिंग अ‍ॅथारिटीच्या ताब्यात येते. त्यानंतर एडीटीपी विभागाकडे टाऊन स्कीम मंजूर झाल्यांनतर जे काही आरक्षण त्याच्यामध्ये नमूद केलेले होते. त्या आरक्षणाची जागा त्या प्लॉनिंग अ‍ॅथारिटीच्या ताब्यात येतात.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी,पाईटऑफ इन्फोंमेशन, ज्या स्कीम त्या जागेत मंजूरीच्या आहेत त्या दुस-या स्कीम मंजूरीकरिता पाठविल्या आहेत काय? ते बोलतांना त्यांनी नमुद केले आहे जेव्हा ते मंजूर होवून राज्य सरकारकडून आपल्याकडे येईल तेव्हा ते सगळे आरक्षण मंजूर होतील.

श्री. मोरोणे(उपायुक्त, स्मार्ट सिटी):-मा.महापौरजी, अगदी बरोबर आहे. टाऊन प्लॉनिंग स्कीम मंजूर झाल्यानंतर ज्या आरक्षणाखाली जागा आहेत त्या सगळया जागा प्लॉनिंग अ‍ॅथारिटीकडे येतील.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, आता ते मंजूर झाल्या नाहीत. राज्य सरकारकडचे जे मंत्रीमहोदय आहेत त्यांच्याकडून मंजूर होवून यायचे आहे.

श्री.अविनाश ठाकरे:-पाईट ऑफ इन्फोंमेशन, मा.कृष्णाजी खोपडे हे या सभागृहाचे सदस्य नाहीत. त्यांचे वर्जन दिले आहे. म्हणून त्यावर या सभागृहात चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी,पाईटऑफ इन्फोंमेशन, मला असे अजिबात म्हणावयाचे नाही की आमचे आमदार आदरणीय कृष्णाजी खोपडे हे काही चुकीचे म्हणत आहे. परंतु जे वर्तमानपत्रात छापून आले आहे. स्कीम मंजूर होण्याच्या आधी आपण म्हटले आहे.

श्री.अविनाश ठाकरे:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, हे सदन राजकीय चर्चा करण्याकरीता नाही आहे.मोरोणे यांनी सांगितले  की ड्राप पॉलिसी मंजूर झाली आहे. त्या ड्राप पॉलिसी मंजूरीच्या आधारे त्या ठिकाणी त्यांनी असे घोषित केले असेल की अशी ड्राप पॉलिसी मंजूर झालेली आहे त्यामध्ये हॉस्पीटल आहे. मला एक सुचना करावयाची आहे परंतु या राजकीय वक्तव्यामध्ये ते राहून गेले.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी,पाईटऑफआर्डर मा.महापौरजी, माझे कुठल्याही प्रकारचे राजकीय वक्तव्य नव्हते. लिलावती हॉस्पीटल सारखे मोठे हॉस्पीटल आमच्या स्मार्ट सिटीमध्ये यायला पाहिजे. मला एवढेच म्हणावयाचे होते की जे आरक्षण मंजूर होण्याच्या आधी खोपडे साहेब कसे काय म्हणत आहेत.

(बेल)

महापौर:- मोरोणेजी ने बडे स्पष्ट तरीके से अपनी बात रखी । ड्राप् टाऊन प्लॉनिंग स्कीम का उसको राज्य सरकारने मंजूरी प्रदान की । उस ड्राफ्ट टाऊन प्लॉनिंग मे हॉस्पीटल के लिए जगह आरक्षित है। दुसरी एक बात उन्होने की की यह ड्राप्ट टाऊन प्लॉनिंग है जब हम सेकंड प्रोसेस मे जाते है तो  जितनी जगह आरक्षण मे दी गई है यह सारी

जगह का स्वामीत्व अपने आप स्मार्ट सिटी मे आ जाता है। आरक्षण बदलता है ऐसा नही कहा, जो आरक्षण है उसका आरक्षण प्राप्त हो जाता है ऐसा शब्द वापरा। इसका स्पष्ट अर्थ यह होता है की वहां पर आरक्षण है, अगर आरक्षण है तो उस क्षेत्र का जनप्रतिनिधी चाहे नगरसेवक हो, चाहे विधायक हो, वह उसपर वक्तव्य दे सकता है। उन्होने पूर्व मानसिकता से बोलना चाहिए ऐसा नही है। नियमाअंतर्गतगत वह आरक्षण घोषित करना है इसलिये की। घोषणा की प्रतिश्रुती ऐसे रही की विरोधी पक्ष नेता ने भी अपने भाषण मे कहां की वहां पर हॉस्पीटल होना चाहिए। इसलिये नियमो के अंतर्गत वहां पर आरक्षण है। टाऊन प्लानिंग मे सेकंड स्टेज पर उसकी मंजूरी होगी तो उसका स्वामीत्व स्मार्ट सिटी को आयेगा और गती उसमे आगे बढेगी इस प्रकारकी स्थिती है। जो संभ्रम है की आरक्षण नही था तो कृपया वह संभ्रम दूर करे। नियमो के अंतर्गत उन्होने ठीक तरीके से बोला है और मोरोणे ने अपने वक्तव्य मे बडी स्पष्टता से बोला है तो इस विषयपर काही चर्चा हो चुकी है। मा.सदस्य श्री.पोहोणे ने जो पत्र दिया है उसमे उस क्षेत्र के सभी नगरसेवको की मागणी होगी।

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, माझी एक महत्वाची सुचना आहे. सर्वप्रथम मी आपले अभिनंदन करतो की हा ड्राफ्ट आपण सर्व नगरसेवकांना पाठविला. या संदर्भातील ड्राफ्ट आपण सगळया नगरसेवकांना पाठविला आहे आणि त्यावर चांगल्या सुचना येत आहे. या संपुर्ण लोकांची सुनावणी घेवून त्यावर प्रशासनाने आपला ड्राफ्ट शासनाला पाठविला त्यामध्ये एक महत्वाचा मुद्दा आढळला मा.महापौरजी, हा प्रकल्प मंजूर केला तरी त्याला वेळ लागणार आहे. लवादाने प्रश्न केला की ज्याला तुम्ही रिस्टॅबलीश करता आहे, ज्याला घर नाही ज्याला तुम्ही भुखंड देत आहे त्याची काय व्यवस्था आहे. प्रशासनाने असे म्हटले आहे की सीटी सर्व्हेचा रिपोर्ट घेवून त्याला प्लॉट देवू किंवा फ्लॅट देवू. त्यामध्ये मा.महापौरजी एक अडचण अशी आहे सीटी सर्व्हेचा रिपोर्ट आहे परंतु पूर्वी प्रापर्टी कुणाची होती ती ट्रान्सफर झाली काय? त्यामुळे यामध्ये माझी एक विशेष सुचना आहे. फक्त सीटी सर्व्हेचा रिपोर्ट ग्राहय न धरता त्याची पझेशन डेट ज्यावेळेला एखादा माणुस त्या ठिकाणी पझेशन घेवून राहतो त्यावेळी तो इलेक्ट्रिक सप्लॉय घेतो, वॉटर सप्लॉय घेतो, टॅक्स भरतो त्यामुळे हे सुध्दा डॉक्युमेंट ग्राहय धरले तर निश्चितपणाने लॅन्ड ॲक्वीजेशन प्रोसेस फास्ट होईल. त्याबरोबर त्या लोकांची रिइन्टेट फास्ट होईल.या सुचनेचा या मध्ये अंतर्भाव करण्यात यावा.

वरील चर्चेनंतर प्रारूप नगर रचना परियोजना पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी टिपीएस–1 नागपूरप्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(5) अन्वये मंजूरी करीता लवादामार्फत शासनास सादर करण्यापूर्वी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे लवादाने सुचविलेल्या बाबींवर अभिमत.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत पारडी, पुनापूर, भरतवाडा व भांडेवाडी येथे नगर रचना परियोजना (Town Planning Scheme) राबविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप नगर रचना परियोजनेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 68(2) अन्वये राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याबाबतची अधिसूचना दि. 24.10.2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसध्दि करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेतील तरतूदीनूसार विकास आराखडयातील जमिन वापरात बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये राज्य शासनाने मंजूरी प्रदान केली असून त्याबाबतची अधिसूचना भाग 1–अ (असा) (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. 159, दि. 22.11. 2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रारूप नगर रचना परियोजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72 अन्वये राज्य शासनाने सहाय्यक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती केली आहे व त्याबाबतची अधिसूचना क्र. भाग 1–अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा.रा. अ.क्र. 218, दि. 16.11.2018 च्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

लवाद यांनी महाराष्ट्र नगर रचना योजना नियम 1974 चे नियम क्र. 13 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. 28.12.2012 रोजी आणि स्थानिक वृत्तपत्र दै. लोकमत व इंग्रजी दै. द हितवाद मध्ये दि. 29.12. 2018 रोजी सूचना प्रसिध्द करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 102 अन्वये सदर्हु नगर रचना परियोजना तयार करण्यात आल्यामुळे त्यामध्ये अपायकारकरीत्या बाधीत झालेल्या व या परियोजनेमध्ये समाविष्ट झालेलया जागांमध्ये हित संबंधि असलेल्या व्यक्तींकडून विहीत 60 दिवसाचे मुदतीत / आक्षेप/हरकती मागविण्यात आल्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(4) आणि महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम 13(3) नूसार, फार्म–1 मध्ये नमूद संबंधित जमिन मालक यांना विशेष नोटीस बजावून प्रारूप नगर रचना परियोजनेचे त्यांचे जागेतील प्रस्तावाबाबत स्थळपाहणी करून माहिती देण्याची व त्यांची तसेच आक्षेप धारकांची सूनावणी घेण्याची कार्यवाही दि. 30.09.2019 पावेतो पुर्ण करण्यात आलेली आहे.

उक्त प्रारूप नगर रचना परियोजनेतील अहवालातील फार्म–1 मधील नोंदीनूसार एकुण 6568 भुखंडधारकांचे नावाची नोंद असून, उक्त धारकांना उपरोक्त नमूद प्रमाणे कलम 72(4) अंतर्गत विशेष नोटीस बजावली असता, सूचनावणीस्तव एकुण 543 जमिनधारक/ भुखंडधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित झालेले असून त्यापैकी काही जमिनधारकांचे / भुखंडधारकांचे एकापेक्षा अधिक सि.स.क्र. चे जागेमध्ये मालकीहक्क आहेत. तसेच कलम 102 अंतर्गत एकुण 717 आक्षेप प्राप्त झालेले असून त्यापैकी सूनावणीस्तव 641 आक्षेपधारक उपस्थित राहिलेले असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. आणि संबंधित जमिन मालक तसेच आक्षेप धारक यांचे कडून सूनावणीमध्ये मांडण्यात आलेले मुद्दे करण्यात आलेल्या मागण्या आणि त्याअनुषंगाने प्रारूप नगर रचना परियोजनेमधील नियोजन विचारात घेवून कलम 72(4) मधील तरतूदीनूसार प्राथमिक

परियोजनेचा (Preliminary Scheme) प्रकरणनिहाय अहवाल लवादाने तयार केला आहे.

प्रस्तावित प्रारूप नगर रचना परियोजनेतील 1730 एकर जागेकरीता नागपूर सुधार प्रनयास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस–2419/1419/सी.आर. 154–2019/नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

प्रस्तावित प्रारूप नगर रचना परियोजनेतील 1730 एकर जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस–2419–1419–सि.आर. –154–2019–नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस– 2419–1419–सी.आर. 154–2019–नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये उक्त नगर रचना योजनेकरीता नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका यांची नियुक्ती झालेली आहे. उक्त प्राथमिक परियोजना (Preliminary T.P. Scheme) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(5) अन्वये मंजूरीकरीता शासनास सादर करणेपूर्वी या परियोजनेचा प्रकरणनिहाय अहवाल तयार करतांना काही खालील प्रमाणे नमूद ठळक बाबीवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 72(7) (बी) मधील तरतूदीनूसार नियोजन प्राधिकरणास सूनावणी देण्याकरीता लवाद यांनी पत्र क्र. नरयो क्र. 1/नाग/कलम 72(7)(बी)/ लवाद 988, दि. 07.12.2019 अन्वये नोटीस बजावून नागपूर महानगरपालिकेच्या वतीने मा. आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने दि. 18.12.2019 रोजी उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे. सदर पत्र नस्तीत टांचण करण्यात आले आहे, कृपया अवलोकन व्हावे. मा. आयुक्त यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL, Nagpur यांना सदर सूनावणीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश दिले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी हे कार्यालयीन कामाकरीता दिल्ली येथे उपस्थित असल्याकारणाने सदर सूनावणी दि. 21. 12.2019 रोजी पार पडली. या सूनावणी दरम्यान लवादाने प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर चर्चा करण्यात आली. तसेच मा. मुख्य कार्यवाही अधिकारी, NSSCDCL, Nagpur यांनी सदर प्रकरणी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचे अभिमत घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. सदर सूनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनूसार लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवर मुख्य कार्यवाही अधिकारी यांचे अभिप्राय पत्र क्र. 2113/ NSSCDCL/2019, Dt. 21/12/2019 नूसार लवाद यांना कळविण्यांत आले.

सूनावणीमध्ये नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात येत असलेल्या अहवालातील प्रकरण निहाय नमूद बाबींवर नियोजन प्राधिकरणाचे अभिमत प्राप्त होणे आवश्यक आहे. शिवाय कलम 72(4) अन्वये पार पाडलेल्या सूनावणीमधील संबंधित जमिन मालक/आक्षेप धारकांकडून उपस्थित करण्यात आलेल्या सर्वसाधारण बाबींवर आणि लवादांचे निदर्शनास आलेल्या बाबींवर सुध्दा नियोजन प्राधिकरण असलेल्या नागपूर महानगरपालिकेचे स्पष्ट मत / निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य कार्यवाही अधिकारी यांचे लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवरच्या अभिप्रायावर नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेचा अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूर करणेचा विषय विचारात घेणे, आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील अभिप्राय मा. सभागृहापुढे मंजूरीस्तव व पुढील आदेशार्थ सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून स्मार्ट सिटीशी निगडीत विषय आहे आणि या विषयावर ज्याप्रमाणे आपण कार्यवाही करीत आहे त्या दृष्टीने आलेले जे आक्षेप आहे त्या आक्षेपचा निर्धार करण्याच्या दृष्टीने आरबिट्रेटर नियुक्त करण्यात आलेला आहे. आणि आरबिट्रेटर जे अहवाल सादर केलेला आहे तो या सभागृहासमोर मंजूर करण्यासाठी हा विषय आलेला आहे. मी प्रशासनाला निर्देश देतो की संबंधित आरबिट्रेटरने जे निर्णय दिले आहे त्या विषयाची संपुर्ण प्रत प्रत्येक नगरसेवकांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी. याबाबतचे निर्देश मा. सभागृहापुढे दि. 20.01.2021 रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशान्वये कार्यवाही पत्र क्र. मनपा/नरवि/2523, दि. 10.02.2021 रोजी करण्यात आलेली आहे. मा. सभागृहाने कार्यवाही पुर्ण करून प्रस्तावित केलेल्या मुद्दयांवरच्या अभिप्रयावर नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या अभिप्राय पुनश्चः मा. सभागृहापुढे मंजूर करणेचा विषय विचारात घेणे, आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील अभिप्राय मा. सभागृहापुढे पुनश्चः मंजूरीस्तव व पुढील आदेशार्थ सादर प्रश्न विचारात घेवून ज्या क्षेत्रामध्ये दाट लोक वस्ती असून, जास्तीत जास्त घरे बांधलेली आहेत. उदा. गुलमोहर नगर चौक ते पारडी घाटापर्यंत जाणारा रस्ता जर खाली प्लॉट असलेल्या क्षेत्रात नेला असता, तर लोकांच्या घराचे नुकसान कमी होईल व रोड बनविण्याकरिता सोईचे होईल. स्मार्ट सिटी योजने अंतर्गत रस्ते तयार  करण्याकरिता रस्त्यांमध्ये बाधीत ज्या जमिनी, घरे, प्लॉट किंवा शेतातील भाग बाधीत होत आहे. अशा बाधीत होणा—या भागास भुसंपादनाच्या अधिनियमाप्रमाणे चारपट मोबदला देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करुनच उपरोक्त जमीन अधिग्रहीत करण्यात यावी. तसेच 60 फुट व 80 फुट असे रस्ते अर्धवट अशाप्रकारे कामे सुरु आहे ते रस्ते वाढवून मोठया रोडपर्यंत किंवा हायवे रोडपर्यंत पुर्ण करण्यात यावे आणि काही समाजांनी समाजाकरिता जागा घेण्यात आलेली आहे. त्या जागेवर स्मार्ट सिटीचे आरक्षण किंवा जमिनीच्या मधातून असलेला रोड वगळण्यांत यावे. स्मार्ट सिटीच्या बोर्ड मिटींगमध्ये त्या क्षेत्रातील आमदार व नगरसेवकांना आमंत्रित सदस्य म्हणून प्रत्येक बैठकीला बोलाविण्यात यावे. या मा.सदस्य श्री. प्रदीप पोहाणे यांनी दिलेली लेखी सुचना तसेच सिटी सर्व्हे रिपोर्टच ग्राहय न धरता त्याची पझेशन डेट ज्यावेळेला एखादा माणुस ज्या ठिकाणी घर बांधून राहतो त्यावेळेला

तो इलेक्ट्रिक सप्लॉय घेतो, वॉटर सप्लॉय घेतो, टॅक्स भरतो हे डाक्युमेंट त्यांच्या पझेशन डाक्युमेंटमध्ये ग्राहय धरले तर निश्चितच लॅन्ड ॲक्वीजेशनची प्रोसेस फास्ट होईल त्याचबरोबर त्या लोकांचे रिइन्स्टेंटची प्रोसेस फास्ट होईल. या मा.सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा. मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.८९/वि.क्र.५०** :- स्थायी समिती ठराव क्र. 96 दिनांक 18/05/2019 अन्वये
**{बाजार विभाग}** राष्ट्रीय गांधी मार्केट सक्करदरा येथील लाभार्थ्यांची नावे रद्द करण्याबाबत म.न.पा. सभागृहा पुढे खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

राष्ट्रीय गांधी मार्केट, सक्करदरा येथे प्रकल्प बांधकाम क्षेत्रात बाधीत झालेल्या व मार्केट परिसरातील लगत रस्त्यावर बुधवार बाजार पर्यंत असलेल्या व्यवसायीकांचे पूनर्वसन अंतर्गत मा. स्थायी समितीचे ठराव क्र. 91 दि. 28/07/2001 अन्वये खालील प्रमाणे म.न.पा. सभागृहा पुढे निर्णयार्थ पाठविण्यात आला होता.

यादी क्र. (1) चे 88 व्यवसायीक,

यादी क्र. (2) चे 102 व्यवसायीक त्याचप्रमाणे

यादी क्र. (3) मधील न आढळलेले 39 मधुन 6 व्यवसायीक व

यादी क्र. (4) मधुन समितीला आढळलेल्या 44 मधुन 33 व्यवसायीक

असे एकुण 229 व्यवसायीकांना नमुद योजने प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्ज व इतर अटि व शर्ती नुसार भाडे तत्वावर दुकान/ओटे आवंटन करण्यात यावे याबाबत म.न.पा. ठराव क्र. 15 दि. 30/07/2001 अन्वये पुढील प्रमाणे एकमताने मंजुरी प्रदान केली.

1) परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस आणि नमुद करण्यात आलेल्या अटि व शर्ती ला मंजुरी प्रदान केली.

2) परिशिष्ट ''ब'' मधील नमुद केलेल्या व्यवसायीकांच्या यादी प्रमाणे क्र. 1 ते 88 असे संपुर्ण 88 व्यवसायीकांना परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम, परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

3) परिशिष्ट ''क'' मधील नमुद केलेल्या व्यवसायीकांच्या यादी क्र. 2 प्रमाणे शिफारस करण्यात आलेल्या अ. क्र. 1 ते अ. क्र. 102 असे संपुर्ण 102 व्यवसायीकांना परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

4) परिशिष्ट ''ड'' मधील यादी क्र. 3 प्रमाणे अ. क्र. 1 ते अ. क्र. 39 व्यवसायीकांपैकी स्थायी समितीव्दारे गठित समितीला आढळलेले क्रमांक 1 ते 4 व 6 आणि 7 असे एकुण 6 व्यवसायीकांना स्थायी समितीव्दारे शिफारसी प्रमाणे परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम, परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

5) परिशिष्ट ''ड'' प्रमाणे सन 1998 च्या म.न.पा. व पी.एम.सी. सर्व्हेक्षणाचे यादी क्र. 4 मध्ये नमूद असलेल्या परंतु सर्व्हेक्षणाच्या वेळेत न आढळलेल्या 33 व्यवसायीका बाबत तसेच परिशिष्ट ''ई'' प्रमाणे राष्ट्रीय गांधी मार्केट संस्थेने सादर केलेल्या यादीतील कार्यालयीन सर्व्हेक्षणात न आढळलेल्या एकुण 44 व्यवसायीकांच्या यादीतील स्थायी समितीव्दारे गठीत केलेल्या समितीला अनुक्रमांक 1 ते 9 व 12 ते 18, 20, 22 ते 27, 29, 31 33 ते 40 असे सर्व्हेक्षणात आढळलेल्या एकुण 33 व्यवसायीकांबाबत राष्ट्रीय गांधी मार्केट संस्थेच्या सहकार्याने सत्यता तपासुन उचित कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान केली.

उपरोक्त सभागृहाने क्र. 1 ते 5 प्रमाणे घेतलेल्या व कार्यान्वीत झालेल्या ठरावा प्रमाणे कार्यालयाने सन 2001 पासुन कार्यवाही सुरू ठेवली व सध्यस्थितीत दुकान/ओटे/जागा याबाबतचा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| अ क्र | यादी क्र. | यादीचे विवरण | यादी प्रमाणे एकुण लाभार्थी | मान्यता प्राप्त झालेले एकुण लाभार्थी | मान्यता प्राप्त पैकी किती लाभार्थ्यांना दुकान/ओटे स्विकृत केले | | मान्यता प्राप्त यादी पैकी उर्वरीत लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | 7 |
| 1 | अ | अटि व शर्ती तसेच समितीचा अहवाल | ....... | ...... . | ....... | | ....... |
| 2 | ब | यादी क्र. 1 :– पी.एम.सी. व म.न.पा. व्दारा 1998 मध्ये सर्व्हेक्षण करून फक्त झोन 1 व झोन 2 च्या परिसरातील दुकानदारांची यादी व राष्ट्रीय गांधी मार्केटच्या संस्थेव्दारे सादर करण्यात आलेल्या अश्या दोन्ही यादीमधुन कॉमन आढळलेले व्यवसायीकांची यादी | 88 | 88 | दुकाने<br>ओटे<br>एकुण | 18<br>45<br>63 | 25 |
| 3 | क | यादी क्र. 2 :– राष्ट्रीय गांधी मार्केट व्दारे झोन 1 व झोन 2 परिसरात व यासमोरील बाजुच्या रस्त्यावर तसेच बुधवार बाजारापर्यंतच्या रस्त्यावर सध्याही भाजीपाला व इतर व्यवसाय करणाऱ्यांच्या सादर केलेल्या यादीवर कार्यालयाव्दारे सहपरिक्षण करून प्रत्यक्ष व्यवसाय करतांना आढळलेल्या व्यवसायीकांची यादी (यादी क्र. 1 मधील नांवे वगळुन) | 102 | 102 | दुकाने<br>ओटे<br>एकुण | 29<br>42<br>71 | 31 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | ड | यादी क्र. 3 :– राष्ट्रीय गांधी मार्केटच्या संस्थेव्दारे सादर करण्यात आलेल्या यादीमध्ये नमुद न केलेले परंतु 1998 च्या म.न.पा. व पी.एम.सी. सर्व्हेक्षण यादीत नमूद असलेले तसेच सर्व्हेक्षणाच्या वेळेस न आढळलेले व्यवसायीकांचे नावांची यादी | 39 | 6 | दुकाने | 0 | 5 |
| | | | | | ओटा | 1 | |
| | | | | | एकुण | 1 | |
| 5 | ई | यादी क्र. 4 :– राष्ट्रीय गांधी मार्केट संस्थेने सादर केलेल्या यादीतील कार्यालयीन सर्व्हेक्षणात आढळलेल्या व्यवसायीकांचे नावांची यादी | 44 | 33 | दुकाने | 3 | 30 |
| | | | | | ओटा | 0 | |
| | | | | | एकुण | 3 | |
| 6 | | लाभार्थ्यां व्यतिरिक्त वाटप / विकलांग व्यक्तींना वाटप | 0 | 0 | दुकाने | 0 | |
| | | | | | ओटे | 3 | |
| | | | | | एकुण | 3 | |
| | | एकुण | 273 | 229 | दुकाने | 50 | 91 |
| | | | | | ओटे | 91 | |
| | | | | | एकुण | 141 | |

मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. 113/2004 या मध्ये दि. 17/10/2013 रोजी आदेश केलेले आहेत. व याचिका खारीज केलेली आहे. (आदेशाची प्रत नस्तीत सलग्न.) ईश्वर चिठ्ठी प्रक्रियेव्दारे वाटप करण्यात आलेल्या दुकान क्रमांका नुसार संबंधीत व्यवसायीकांना दुकानाचा ताबा देण्यात आला.

राष्ट्रीय गांधी मार्केट, सक्करदरा, नागपूर संकुलनातील रिक्त असलेल्या दुकाने/ओट्यांची माहिती.

| अ. क्र. | सक्करदरा येथील संकुलामधील Zone - I व Zone - II तसेच मागील ओट्याची वाटप क्रिया | एकुण दुकाने व ओट्यांची संख्या | वाटप झालेल्या दुकाने व ओट्यांची संख्या | शिल्लक असलेल्या दुकाने व ओट्यांची संख्या | शिल्लक असलेल्या दुकाने व ओट्यांचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | समोरील दुकाने (मोठे) मागील मोठे दुकाने | 29 | 29 | निरंक | |
| 2 | मागील मोठे दुकाने | 06 | 04 | 02 | 12 व 31 |
| 3 | मागील लहान दुकाने | 43 | 17 | 26 | 4,6,19,25,26,27,29, 32,33,34,35,37,38, 40,41,42,43,44,45, 46,47,48,49,51,52 व 53 |
| 4 | एम.ए.सी.बी. करीता | 03 | ..... | 03 | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | संकुलामधील ओटे | 103 | | 91 | | 12 | | शिल्लक ओटा क्र. (एफ) 10, 21 ते 25, 27, 28 ओटा क्र. (आय) 16, 23,27,28 |
| | एकुण | दुकाने<br>ओटे | 81<br>103 | दुकाने<br>ओटे | 50<br>91 | दुकाने<br>ओटे | 31<br>12 | |
| | | एकुण | 184 | एकुण | 141 | एकुण | 43 | |

उपरोक्त प्रमाणे पात्र लाभार्थ्यांना अनेकदा संधी देवुन प्रत्यक्ष पत्राव्दारे/जाहीर सुचना द्वारे/वर्तमानपत्रा व्दारे प्रसिध्दी देवुन सुध्दा राष्ट्रीय गांधी मार्केट, सक्करदरा येथील रिक्त दुकान/ओटे घेण्यास उत्सुक नाही, असे दिसुन येते. सदर प्रकल्पास आज रोजी जवळपास 18 वर्ष पूर्ण होवुनही उपरोक्त तक्ता प्रमाणे अनेक दुकाने रिक्त आहेत तसेच यादी बाहेरील व अपात्र असलेले अनेक व्यवसायीक सद्यःस्थितीत रिक्त दुकान/ओटे घेण्यास उत्सुक आहेत परंतु कार्यालयीन यादी प्रमाणे सर्व पात्र लाभार्थी यांनी दुकान/ओटे/जागा याची मागणी व पैशांचा भरणा न केल्यामुळे आजही रिक्त आहेत व यादीमधील व्यवसायीक आज किंवा उद्या कार्यालयास शुल्क जमा करील अशा प्रतिक्षेत आहेत. तथापी सदर प्रकल्पास झालेला कालावधी फार मोठा असल्यामुळे उपरोक्त प्रमाणे नमुद केलेली यादी क्र. 1 ते 5 हि प्रतिक्षा यादी रद्द करावी, असे कार्यालयास वाटते.

करीता उपरोक्त बाबी बाबत संबंधीत झोनचे बाजार निरिक्षक यांनी राष्ट्रीय गांधी मार्केट सक्करदरा येथील संकुलातील ई–लिलावाव्दारे दुकाने/ओटे आवंटीत करण्यात आले होते, त्यावेळी ई–लिलावा करीता 188 दुकाने/ओटे ची मंजुरी देण्यात आली होती. परंतु 188 दुकान/ओट्यांमधुन रिक्त असलेले चार (4) ओटे क्र. F–17, F–18, F–19 आणि F–20 हे चार ओटे सुलभ शौचालयाकरीता देण्यात आलेले असल्यामुळे दुकान/ओट्यांची संख्या 188 नसुन 184 आहे, याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ) उपरोक्त नमुद केलेले क्र. 1 ते 5 यादी मधील ज्या व्यवसायीकाचे पात्र यादीत नांव आहे व अद्यापही शुल्क भरून दुकान/ओटे चा ताबा घेतलेला नाही, अश्या सर्व पात्र लाभार्थ्यांची यादी रद्द करणे.

ब) रिक्त असलेले दुकान/ओटे/जागा यांचे लिलाव पध्दतीने आवंटन करणे,

उपरोक्त प्रमाणे सादर केलेले प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास ठराव क्र. 96 दिनांक 18/05/2019 अन्वये एकमताने मंजुरी प्रदान केली.

राष्ट्रीय गांधी मार्केट सक्करदरा येथील दुकाने/ओटे आवंटना करीता लाभार्थ्यांच्या यादी क्र. 1 ते 4 म.न.पा. महासभागृहाने मंजुर केली असल्यामुळे, लाभार्थ्यांच्या यादी क्र. 1 ते 4 रद्द करून उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.सतिश होले:- मा.महापौरजी,आपण हा विषय घेतला मा.महापौरजी निश्चितरुपाने आपल्या हातून या नागपूर शहराचा विकास होणार आहे अशी आशा सुध्दा ठेवतो. आपल्या महानगरपालिकेच्या वतीने विषय क्रमांक ५० मध्ये राष्ट्रीय गांधी मार्केट माझ्या प्रभागात येतो. त्या ठिकाणी ८१ दुकाने आणि १०३ ओटे असे एकुण १८४ दुकाने आणि ओटयांची संख्या आहे. आपण त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने त्या ठिकाणी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन देत नाही. महापालिकेने मुख्य रस्त्यावर बांधलेल्या या मार्केटचे दोन पार्ट आहेत. एक १४,४६६ स्केअर फुटाचा आहे आणि दुसरा ९४२९ स्केअर फुटाचा आहे. मला नगर रचना विभागाकडून एवढेच जाणून घ्यावयाचे आहे की आपण त्या ठिकाणी किती जागा पार्किंगकरिता दिली पाहिजे. आपल्याकडे अधिकारी असेल तर गांधीमार्केटमध्ये पार्किंगची व्यवस्था काय आहे ते सांगितले तर बरे होईल.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.मिलींद मेश्राम(उपायुक्त, बाजार विभाग):- मा.महापौरजी, सन्माननीय जेष्ठ सदस्य श्री. सतिशजी होले यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. हे मार्केट बांधण्याचे काम सुरु झालेले होते तेव्हाच या विषयावर कन्स्ट्रक्शन प्लॉनवरती मा. उच्च न्यायालयात नागपूर नागरिक संघटनेतर्फे पीटीशन दाखल करण्यात आली होती. याचिका क्र. ११३/२००४ त्यामध्ये सुध्दा हाच उल्लेख करण्यात आला होता की हे मार्केट बांधण्यात आले आहे त्या मार्केटमध्ये पार्किंगची व्यवस्था ठेवण्यात आलेली नाही.

श्री.सतिश होले:- पाईट ऑफ इन्फोमेशन, या आधी त्या ठिकाणी पार्किंग करु नये असे सांगितले आहे काय? कारण माझ्याकडे नागपूर महानगरपालिकेतर्फे जे डाक्युमेंट उपलब्ध आहेत. ती पुर्ण फाईल माझ्याकडे आहे त्यामध्ये संपुर्ण गांधीमार्केटचे डाक्युमेंट आहेत. नागरिकांची कमेटी होती. कमेटीच्या अध्यक्षासोबत आम्ही या मार्केटला भेट सुध्दा दिली होती त्याचे फोटो सुध्दा दिले होते. या मार्केटच्या बाजूच्या बिल्डींग किती मीटरची असली पाहिजे, पार्किंगकरिता किती जागा दिली पाहिजे हे सर्व त्यात दिले आहे.

महापौर:- होले साहेब मेश्राम साहेबांचे वक्तव्य होवू दयावे त्याच्यात काही चुक असेल तर सांगावे.

श्री.मिलींद मेश्राम(उपायुक्त, बाजार विभाग):- मा.महापौरजी,गांधीमार्केट बांधण्यात आले होते त्या मार्केटच्या बांधकामाच्या विरोधात पीटीशन दाखल झाली होती. ती पीटीशन २०१३ मध्ये डिसमीस झाली होती त्यानंतर मार्केट विभागाने आवंटन देण्याची प्रक्रिया सुरु केली होती. त्यामध्ये किती जागेसाठी , किती पार्किंगचा एरिया असला पाहिजे याची माहिती बाजार विभाग देवू शकत नाही. मा. महापौरजी, एवढीच माहिती देवू इच्छितो, याबाबत पीआय दाखल झाली होती कन्स्ट्रक्शनच्या बाबतीत त्यानंतर ती २०१३ ला डीसमीस झाली होती. (रिट पीटीशनचे वाचन केले)

श्री.सतिश होले:- पाईट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी, त्याचा प्लॉन मंजूर आहे काय? सभागृहाची दिशाभूल

करु नका.

महापौर:- सतिशभाऊ, कोर्टाने आदेश दिला असेल तर त्याच्या विरोधात आपण काही करु शकत नाही.

श्री.सुनिल अग्रवाल:- पाईंट ऑफ इन्फोमेशन, आज विषयपत्रिकापर जो विषय है वह आवंटन के विषय पर है की पार्किंग के विषय पर है इसपर प्रशासनने खुलासा करना चाहिए।

श्री.मिलींद मेश्राम(उपायुक्त, बाजार विभाग):- मा.महापौरजी,हा विषय सभागृहाच्या समक्ष ठेवला आहे. २००१ मध्ये सभागृहाने लाभार्थ्यांची यादी मंजूर केली होती आणि त्या यादीतील लाभार्थ्यांनी अजूनही दुकाने घेतलेली नाही त्यांना वारंवार संधी दिल्यानंतर सुध्दा त्यांनी दुकाने घेतली नाही.

श्री.सतिश होले:- पाईट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी, आपण दिलेली दुकाने आवंटीत झालेली नाहीत. जे मार्केट चुकीच्या पध्दतीने बांधण्यात आलेले आहे. एक चुक झाली म्हणून वारंवारं चुक करावयाची काय? आज आमच्याकडे परिस्थिती अशी आहे एखादा व्यक्ती त्या परिसरात बिमार झाला तर त्याला घेवून जाण्यासाठी गाडी येत नाही. त्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली नाही. चुकीच्या पध्दतीने त्या ठिकाणी मार्केट बांधण्यात आले आहे आणि अशा मार्केटचा आपण पुनरुथ्थान करायला निघालात. मला एवढीच विनंती करावयाची आहे त्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करावी त्याच्या नंतर मार्केट करावे. हे मार्केट चुकीच्या पध्दतीने बांधण्यात आलेले आहे. या ठिकाणी शिल्लक असलेली ३१ दुकाने आणि १२ ओटे आहेत. त्या मार्केटच्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था उपलब्ध केली पाहिजे. या आधीचे ज्या दुकानांचे अलॉटमेंट झाले आहे ते किती चुकीचे दिलेले आहे. उदाहरण दयायचे झाल्यास मा.महापौरजी, आपल्या मार्केट विभागाचे अधिकारी यांनी पदकी नावाचे जे व्यक्ती आहेत त्यांचे दुकान अंकुश पाटील यांना दिले. यामध्ये खुप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. भ्रष्टाचार करणारा हा मा.सदस्यांचा पी.ए.आहे.

श्री. अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन, मा.सदस्य अशा प्रकारचा आरोप करीत आहे. पुराव्याशिवाय असा आरोप करणे योग्य नाही.

श्री.सतिश होले:- मा.महापौरजी, पुरावे निशी माहिती देत आहे. माझ्याकडे त्याची प्रत आहे.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर, मा.सदस्य श्री. सतिश होले जे बोलत आहे. ते पुरावे दाखवीत आहे म्हणजे वस्तुस्थिती आहे. भ्रष्टाचार झालेला आहे त्याची निश्चितपणाने चौकशी केली पाहिजे.

श्री. अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, निश्चित चौकशी झाली पाहिजे. परंतु एका मा.सदस्यांचे नाव घेवून त्यांचे पी.ए.म्हणणे हे बरोबर नाही. ज्यांनी केले त्याचे नाव घ्यावे सन्माननीय सदस्याचे नाव घेणे बरोबर नाही.

श्री.सतिश होले:- मा.महापौरजी, दुकान एका व्यक्तीच्या नावावर आहे त्याच्यावर दुस-या व्यक्तीचा फोटो लावून दुकान विकले आहे याच्यात आपले मा.सदस्य आहेत. या भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे तसे आपण आदेश दयावे असे माझे प्रामाणिक मत आहे. त्याचे पुर्ण पुरावे मी देतो.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, माझे एक सबमीशन आहे. याची चौकशी निश्चित करावी परंतु यांनी एका नगरसेवकाचे नाव घेतले आहे ते वक्तव्य काढून घेण्यात यावे.

वरील चर्चेनंतर स्थायी समिती ठराव क्र. 96 दिनांक 18/05/2019 अन्वये राष्ट्रीय गांधी मार्केट सक्करदरा येथील लाभार्थ्यांची नावे रद्द करण्याबाबत म.न.पा. सभागृहा पुढे खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

राष्ट्रीय गांधी मार्केट, सक्करदरा येथे प्रकल्प बांधकाम क्षेत्रात बाधीत झालेल्या व मार्केट परिसरातील लगत रस्त्यावर बुधवार बाजार पर्यंत असलेल्या व्यवसायीकांचे पूनर्वसन अंतर्गत मा. स्थायी समितीचे ठराव क्र. 91 दि. 28/07/2001 अन्वये खालील प्रमाणे म.न.पा. सभागृहा पुढे निर्णयार्थ पाठविण्यात आला होता.

यादी क्र. (1) चे 88 व्यवसायीक,

यादी क्र. (2) चे 102 व्यवसायीक त्याचप्रमाणे

यादी क्र. (3) मधील न आढळलेले 39 मधुन 6 व्यवसायीक व

यादी क्र. (4) मधुन समितीला आढळलेल्या 44 मधुन 33 व्यवसायीक

असे एकुण 229 व्यवसायीकांना नमुद योजने प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्ज व इतर अटि व शर्ती नुसार भाडे तत्वावर दुकान/ओटे आवंटन करण्यात यावे याबाबत म.न.पा. ठराव क्र. 15 दि. 30/07/2001 अन्वये पुढील प्रमाणे एकमताने मंजुरी प्रदान केली.

1) परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस आणि नमुद करण्यात आलेल्या अटि व शर्ती ला मंजुरी प्रदान केली.

2) परिशिष्ट ''ब'' मधील नमुद केलेल्या व्यवसायीकांच्या यादी प्रमाणे क्र. 1 ते 88 असे संपुर्ण 88 व्यवसायीकांना परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम, परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

3) परिशिष्ट ''क'' मधील नमुद केलेल्या व्यवसायीकांच्या यादी क्र. 2 प्रमाणे शिफारस करण्यात आलेल्या अ. क्र. 1 ते अ. क्र. 102 असे संपुर्ण 102 व्यवसायीकांना परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

4) परिशिष्ट ''ड'' मधील यादी क्र. 3 प्रमाणे अ. क्र. 1 ते अ. क्र. 39 व्यवसायीकांपैकी स्थायी समितीव्दारे गठित समितीला आढळलेले क्रमांक 1 ते 4 व 6 आणि 7 असे एकुण 6 व्यवसायीकांना स्थायी समितीव्दारे शिफारसी प्रमाणे परिशिष्ट ''अ'' प्रमाणे प्रिमियम, परवाना शुल्क, मेंटनन्स चार्जेस व सर्व अटि व शर्तीसह प्रथम तीन वर्षाकरीता ओटे/दुकान वाटप करण्यास मंजुरी प्रदान केली.

5) परिशिष्ट ''ड'' प्रमाणे सन 1998 च्या म.न.पा. व पी.एम.सी. सर्व्हेक्षणाचे यादी क्र. 4 मध्ये

नमूद असलेल्या परंतु सर्व्हेक्षणाच्या वेळेत न आढळलेल्या 33 व्यवसायीका बाबत तसेच परिशिष्ट ''ई'' प्रमाणे राष्ट्रीय गांधी मार्केट संस्थेने सादर केलेल्या यादीतील कार्यालयीन सर्व्हेक्षणात न आढळलेल्या एकुण 44 व्यवसायीकांच्या यादीतील स्थायी समितीव्दारे गठीत केलेल्या समितीला अनुक्रमांक 1 ते 9 व 12 ते 18, 20, 22 ते 27, 29, 31 33 ते 40 असे सर्व्हेक्षणात आढळलेल्या एकुण 33 व्यवसायीकांबाबत राष्ट्रीय गांधी मार्केट संस्थेच्या सहकार्याने सत्यता तपासुन उचित कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान केली.

उपरोक्त सभागृहाने क्र. 1 ते 5 प्रमाणे घेतलेल्या व कार्यान्वीत झालेल्या ठरावा प्रमाणे कार्यालयाने सन 2001 पासुन कार्यवाही सुरू ठेवली व सध्यस्थितीत दुकान/ओटे/जागा याबाबतचा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

<table>
<tr><th>अ क्र</th><th>यादी क्र.</th><th>यादीचे विवरण</th><th>यादी प्रमाणे एकुण लाभार्थी</th><th>मान्यता प्राप्त झालेले एकुण लाभार्थी</th><th colspan="2">मान्यता प्राप्त पैकी किती लाभार्थ्यांना दुकान/ओटे स्विकृत केले</th><th>मान्यता प्राप्त यादी पैकी उर्वरीत लाभार्थी</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td colspan="2">6</td><td>7</td></tr>
<tr><td>1</td><td>अ</td><td>अटि व शर्ती तसेच समितीचा अहवाल</td><td>.......</td><td>.......</td><td colspan="2">.......</td><td>.......</td></tr>
